


RNI NO. MAHMAR/2020/84035

BAHUJAN SAURABHA

# बहुजन सौरभ




सोमवार, २६ मे २०२५ | वर्ष : ५ | अंक : १४८ | दैनिक | किंमत : ₹ ५/-
Monday, 26 May 2025 | Year : 5 | Issue : 148 | Daily | Rate: Rs. 5/-

# ... तर भाजपाच्या वाचळवीर नेत्यांची हकालपट्टी करायला हवी : मल्लिकार्जुन खरगे



**नवी दिल्ली :** भाजपाचे हरियाणामधील राज्यसभेचे खासदार रामचंद्र जांगरा यांनी पहलगाम हल्ल्यात ज्यांनी आपल्या घरातील पुरूष गमावला त्या महिलांबद्दल वादग्रस्त आणि असंवेदनशील विधान केले होते. या विधानावर आता काँग्रेसने तीव्र आक्षेप घेतला असून भाजपा अशा वाचाळवीर नेत्यांवर टीका का करत नाही? असा सवाल काँग्रेस नेत्यांनी उपस्थित केला आहे.

काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी एक्सवर पोस्ट करत थेट प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनाच यासंबंधी जाब विचारला आहे. यासाठी त्यांनी भाजपाच्या वाचाळवीर नेत्यांची यादी आणि त्यांचे विधानही दिले आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि भाजपा नेतृत्वाचे मौन हे खासदार जांगरा यांच्या विधानाला मान्यता दिल्याचे द्योतक आहे. पहलगामच्या पीडितांना आणि सैन्यदलाला बदनाम करण्यासाठी भाजपा नेत्यांमध्ये स्पर्धा लागली आहे, अशी टीका खरगे यांनी केली. मल्लिकार्जुन खरगे यांनी लिहिले की, भाजपाचे खासदार रामचंद्र जांगरा यांनी अपमानजनक विधान केले असून त्यातून भाजपा-संघाची मानसिकता दिसून येत आहे. मध्य प्रदेशचे उपमुख्यमंत्री जगदीश देवडा यांनी आपल्या शूरवीर सैन्याचा अवमान केला. पण मोदीजी शांत राहिले. मध्य प्रदेशचे मंत्री विजय शाह यांनी कर्नल सोफिया कुरेशी यांच्याबाबत अभद्र टिप्पणी केली. त्यांच्यावर आजवर कारवाई झालेली नाही.

> पहलगामच्या हल्ल्यात नौदलाचे अधिकारी शहीद झाले. त्यांच्या पत्नीला सोशल मीडियावर ट्रोल केले गेले. त्यावेळीही प्रधानमंत्री मोदी शांत राहिले. प्रधानमंत्री मोदी काही दिवसांपूर्वी म्हणाले की, माझ्या नसांमध्ये रक्त नाही तर सिंदूर वाहते. जर हे खरे असेल तर भाजपाच्या वाचळवीर नेत्यांची तुम्ही हकालपट्टी करायला हवी.
>
> – मल्लिकार्जुन खरगे

# युद्धबंदीनंतरही सीमेवर भारतीय सैनिक शहीद का होत आहेत ?

## विजयी मिरवणुका काढणाऱ्यांनी याचे उत्तर द्यावे : माकप



**नवी दिल्ली :** व्यापारबंदीची धमकी दिल्यानंतर भारत व पाकिस्तान यांनी युद्धबंदी जाहीर केल्याचे अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी जाहीर केले होते. डोनाल्ड ट्रम्प यांना असे जाहीर करण्याचा खरेतर कोणताही अधिकार नाही. काश्मीर व संबंधित बाबी या भारत व पाकिस्तान यांचा अंतर्गत प्रश्न आहे अशा प्रकारची भूमिका सातत्याने आजपर्यंत भारताने घेतलेली होती. मात्र मोदी सरकारच्या राजवटीत कदाचित या स्वाभिमानी व भारताच्या हिताच्या भूमिकेला तिलांजली देण्यात आली असल्यामुळे असे झाले आहे. ट्रम्प यांनी जाहीर केल्याप्रमाणे खरोखरच युद्धबंदी झाली असेल तर मग सीमेपलीकडून होणारा गोळीबार तसेच सीमेच्या आतमध्येही सुरू असणारा गोळीबार थांबला पाहिजे होता. मात्र तसे झालेले नाही. अहिल्यानगर जिल्ह्याच्या अकोले तालुक्यातील ब्राह्मणवाडा येथील सुपुत्र शहीद संदीप गायकर यास चकमकीमध्ये आपले प्राण गमवावे लागले आहेत. युद्धबंदी असतानाही या आमच्या लेकराला प्राण का गमवावे लागले? विजयी मिरवणुका काढणारे हा प्रश्न ट्रम्प आणि पाकिस्तानला विचारणार आहेत का? देशवासीयांपासून काही लपविले जाते आहे का? असा ठोस प्रश्न मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष राज्यकर्त्यांना व भारतीय जनता पक्षाला विचारत आहे. शहीद संदीप गायकर यांच्या शहीद होण्याची बातमी त्यांच्या ब्राह्मणवाडा गावात व अकोले तालुक्यात येऊन धडकली असताना सुद्धा तेथील भाजप व संबंधित नेत्यांनी मोदींना विजयाचे श्रेय देणारी यात्रा काढली. राज्यभर व देशभर अशा विजयी यात्रा काढल्या जात आहेत. एकीकडे विजय यात्रा काढायच्या, युद्धबंदीचे सुद्धा राजकारण करायचे, श्रेय घ्यायचे व दुसऱ्या बाजूला शेतकरी, कष्टकरी, श्रमिक जनतेची लेकरे सीमेवर शहीद होत असताना युद्धबंदी असल्याचे सांगायचे ही अनेक प्रश्नांना जन्म देणारी बाब आहे. भारतीयांपासून काही लपविले जात आहे का? असा प्रश्न यामुळे उपस्थित होतो आहे.

# रशियाचा युक्रेनवर सर्वात मोठा हवाई हल्ला

**नवी दिल्ली :** गेल्या दोन वर्षांपेक्षा जास्त काळापासून रशिया आणि युक्रेनमध्ये संघर्ष सुरु आहे. रशिया सातत्याने युक्रेनवर हल्ले करत असून या संघर्षात युक्रेनमधील अनेक शहरात मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे पाहायला मिळत आहे. एवढेच नाही तर या युद्धाचे परिणाम जगभरातील अनेक देशांवर देखील होत असल्याचे पाहायला मिळते. रशिया-युक्रेनमधील संघर्ष थांबण्यासाठी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी देखील मध्यस्थी केली होती. मात्र, त्यांच्या मध्यस्थीला अद्याप यश आलेले नाही.

अशातच आता रशिया आणि युक्रेन संघर्षाबाबत आणखी एक मोठी माहिती समोर आली आहे. कैद्यांच्या अदलाबदलीदरम्यान रशियाने युक्रेनवर सर्वात मोठा हवाई हल्ला केला असल्याची माहिती समोर आली आहे. या हल्ल्यात 13 जणांचा मृत्यू झाल्याचे सांगितले जात आहे. रशियाने युक्रेनियन शहरांवर 367 ड्रोन आणि



13 जणांचा मृत्यू; अनेक जण जखमी

क्षेपणास्त्रे डागले, यात 13 जणांचा मृत्यू झाला. या हल्ल्याला युक्रेननेही जोरदार प्रत्युत्तर दिले. रशियन सैन्याने युक्रेनच्या काही शहरांवर 367 ड्रोन आणि क्षेपणास्त्रे डागले. रशिया आणि युक्रेन आजपर्यंतच्या संघर्षातील सर्वात मोठा हवाई हल्ला मानला जात आहे. यामध्ये कीव, खार्किव, मायकोलाईव, टेर्नोपिल आणि खमेलनित्स्की या ठिकाणी हे हल्ले झाल्याचे सांगितले जात आहे. या हल्ल्यामुळे पायाभूत सुविधांवर मोठा परिणाम झाला आहे.

# जूनमध्ये होणार 'या' 5 जागांसाठी पोटनिवडणुका

## निवडणूक आयोगाची घोषणा

**मुंबई :** निवडणूक आयोगाने गुजरात, केरळ, पंजाब आणि पश्चिम बंगालमधील पाच विधानसभा मतदारसंघांमधील पोटनिवडणुकांचे वेळापत्रक जाहीर केले आहे. रविवारी आयोगाने ही घोषणा केली आहे. अधिकृत अधिसूचनेनुसार, चारही राज्यांमधील पोटनिवडणुकांसाठी 19 जून रोजी मतदान होणार आहे. तसेच 23 जून रोजी मतमोजणी होईल.

निवडणूक आयोगाच्या अधिकृत अधिसूचनेत पोटनिवडणुकांसदर्भात इतर महत्त्वाच्या तारखादेखील सूचित केल्या गेल्या आहेत. राजपत्र



अधिसूचना 26 मे रोजी जारी केली जाईल असे या आयोगाच्या सूचनेत म्हटले आहे.

या निवडणुकीसाठी नामांकन अर्ज दाखल करण्याची शेवटची तारीख 2 जून असेल, तर नामांकन अर्जांची पडताळणी करण्याची शेवटची तारीख 3 जून असेल.

एखाद्या निवडून आलेल्या सदस्याने राजीनामा दिला किंवा त्याचा मृत्यू झाला तसंच अपात्रतेमुळे ज्या जागा रिक्त होतात त्या जागांवर उमेदवार निश्चित करण्यासाठी पोटनिवडणुका घेतल्या जातात. पोटनिवडणुका फक्त रिक्त असलेल्या जागांसाठीच घेतल्या जातात. पोटनिवडणुकांमध्ये ज्या मतदारसंघात जागा रिक्त झाली आहे, त्या मतदारसंघातील मतदारच मतदान करण्यास पात्र असतात. पोटनिवडणुकांचे मतदान सार्वत्रिक किंवा इतर निवडणुकांसारखे मोठ्या प्रमाणात होत नाही. तसेच त्यांचा प्रचार खर्चही तुलनेने कमीच असतो. या निवडणुकांचा कालावधी काही आठवडेच असतो.

# केरळच्या किनायाजवळ जहाज उलटले; प्रशासनाकडून सतर्कतेचा इशारा



**त्रीवेंद्रम :** केरळमधील कोचीच्या किनाऱ्यापासून 38 नॉटीकल मैल अंतरावर एक लायबेरियन ध्वज असलेले कंटेनर जहाज MSC ELSA x हे शनिवारी झुकण्यास सुरूवात झाली होती. हे जहाज आता पूर्णपणे पाण्यात उलटले आहे. इतकेच नाही तर यामधून तेल गळती होण्याचा धोका असल्याची माहिती रविवारी अधिकाऱ्यांनी दिली आहे. या जहाजावरील सर्व क्रुज सदस्यांना वाचवण्यात आले आहे. कोस्टल गार्ड्सनी दिलेल्या माहितीनुसार, या जहाजामध्ये वाहतूक केली जात असलेल्या 13 कंटेनर्समध्ये धोकादायक माल होता आणि 12 कंटेनर्समध्ये कॅल्शियम कार्बाइड होते. या दरम्यान केरळच्या राज्य आपत्ती व्यवस्थापन विभागाने नागरिकांना किनाऱ्यावर वाहून आलेल्या वस्तूंपासून दूर राहण्याचा इशारा दिला आहे.

# अंबा एक्सप्रेसची ओव्हरहेड वायर तुटून अनेक गाड्यांचे वेळापत्रक कोलमडले



रेल्वे वाहतूक विस्कळीत

**मूर्तिजापूर :** मुंबई-अमरावती दरम्यान धावणाऱ्या अंबा एक्सप्रेसची ओव्हरहेड वायर तुटल्याने मध्य रेल्वेच्या अप-डाऊन मार्गावरील वाहतूक पूर्णतः विस्कळीत झाली आहे. ही घटना शनिवारी घडली असून अकोला जिल्ह्यातील मूर्तिजापूर रेल्वे स्थानकाजवळ सदरचा प्रकार समोर आला. या तांत्रिक बिघाडामुळे मुंबई आणि हावडाकडे जाणाऱ्या विविध महत्त्वाच्या गाड्यांचे वेळापत्रक कोलमडले असून, प्रवाशांचे प्रचंड हाल सुरू झाले आहेत. ही वायर तुटल्यामुळे अमरावती एक्सप्रेस, विदर्भ एक्सप्रेस, अमरावती-पुणे एक्सप्रेस, नागपूर-पुणे एक्सप्रेस अशा अनेक गाड्यांना नजीकच्या स्थानकांवर थांबवण्यात आले आहे. रेल्वे प्रशासनाने युद्धपातळीवर दुरुस्तीचे काम सुरू केले असून, किमान दोन तासांचा कालावधी लागणार असल्याचे प्राथमिक अंदाज आहेत. रेल्वेच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, ओव्हरहेड वायरमधील हा तांत्रिक बिघाड अचानक घडला असून, वीजपुरवठा खंडित झाल्यामुळे अनेक गाड्या मार्गातच अडकून पडल्या आहेत.

# लाडकी बहीण योजनेसाठी आदिवासी विभागाचा निधी वळवला : विरोधकांचा आरोप



**मुंबई :** लाडकी बहीण योजना ही महाराष्ट्रातील महायुती सरकारची एक महत्त्वकांक्षी योजना आहे. या योजनेवर हजारो कोटी रुपये खर्च होत होत आहेत. महायुती सरकारने या योजनेसाठी सामाजिक न्याय विभागाचे 410 कोटी रुपये महिला व बालविकास विभागाकडे वर्ग केले होते. सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी याबद्दलची नाराजी जाहीरपणे बोलून दाखवली होती. तसेच केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी देखील हा मुद्दा लावून धरला होता. पाठोपाठ आता लाडकी बहीण योजनेसाठी आदिवासी कल्याण विभागाचे 335 कोटी रुपये महिला व बालविकास विभागाकडे वळवल्याचा दावा विरोधकांकडून केला जात आहे. यावरून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी सरकारवर टीका केली आहे. रोहित पवार म्हणाले, 'राज्यातील बहुसंख्य आदिवासी जनता दुर्गम भागात राहते. तिथे आजही रस्ते नाहीत, पुरेशा आरोग्य सेवा उपलब्ध नाहीत. यासाठी शरद पवार यांनी पुढाकार घेऊन आदिवासींच्या लोकसंख्येप्रमाणे वेगळा निधी आरक्षित करून समाजासाठी वापरण्यात यावा असा निर्णय घेतला होता. त्यासंबंधीचा आदेश त्यांनी 30 वर्षांपूर्वी काढला होता. मात्र आता तो निधी इतरत्र वळवला जात आहे. त्यामुळे कृपा करून निधीची अशी वाळवावळवी करू नका अशी विनंती मी सरकारला करेन. निधी वळवण्याऐवजी राज्याचं उत्पन्न कसे वाढवता येईल यासाठी प्रयत्न करा, असा सल्ला मी सरकारला देईन'.

# डोनाल्ड ट्रम्प यांचे नाव वापरुन कर्नाटकमध्ये 1 कोटींची फसवणूक!



**बंगळुरु :** अमेरिकेचे राष्ट्रध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे नाव वापरून 150 पेक्षा अधिक लोकांची 1 कोटीपेक्षा जास्त रुपयांची फसवणूक करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. आता अनेक पीडितांनी मदतीसाठी तसेच गमावलेले पैसे परत मिळवण्यासाठी पोलिसांकडे धाव घेतली आहे.

डेक्कन हेराल्डच्या रिपोर्टनुसार, कर्नाटक राज्यातील बंगळुरु, तामकुरु, मंगळुरु आणि हवेरी अशा वेगवेगळ्या ठिकाणी लोकांची फसवणूक करण्यात आली आहे. या लोकांची फसवणूक करण्यासाठी आरोपींनी 'ट्रम्प हॉटेल रेंटल' नावाच्या ॲपचा वापर केला, आणि त्यांनी गुंतवलेली रक्कम दुप्पट करण्याचे आश्वासन पीडितांना दिले. इतकेच नाही पीडितांचा विश्वास जिंकण्यासाठी डोनाल्ड ट्रम्प यांचा कृत्रिम बुद्धिमत्ता वापरून तयार केलेला व्हिडीओ देखील वापरण्यात आला. फसवण्यात आलेल्या लोकांना त्यांच्या गुंतवणुकीचा लवकर आणि मोठा मोबदला दिला जाईल असे सांगण्यात आले होते.

# वढोली येथे प्राचीन खडककलेचे दुर्मिळ अवशेष

**चंद्रपूर :** जिल्ह्यातील गोंडपिपरी तालुक्यातील वढोली गावाजवळ प्राचीन इतिहासाच्या पाऊलखुणाआढळल्याा आहेत. इतिहास अभ्यासक अरुण झगडकर यांच्या संशोधनपूर्वक क्षेत्रीय पाहणीत इथे तब्बल 60 ते 70 कोरीव खडकचित्रे आढळून आली आहेत. ही चित्रे उघड्या खडकाळ उंचवट्यावर रेखाटलेली असून, त्यांचा संबंध आदिमानवाच्या जीवनशैलीशी असण्याची दाट शक्यता आहे. यामध्ये रेषात्मक आकृती, प्राण्यांचे, मानवाकृतींचे आणि धार्मिक प्रतिकांचे स्वरूप पाहता या स्थळाचे पुरातत्त्वीय मूल्य अत्यंत मोठे आहे. विशेष म्हणजे, या दुर्मीळ चित्रांपैकी एक दगड स्थानिक लोकांनी देवस्थान मानून शेंदूर लावून पूजेसाठी राखलेला आहे; मात्र या संपूर्ण



स्थळाचा ऐतिहासिक व सांस्कृतिक दृष्टिकोनातून आजवर गांभीर्याने विचार झालेला नाही.

विदर्भात विशेषतः गोंड आणि कोरकू आदिवासी जमातींची परंपरा आहे. त्यांच्या पिढ्यानपिढ्यांच्या सांस्कृतिक सवयींमध्ये निसर्ग, खडक, वृक्ष यांची उपासना महत्त्वाची राहिली आहे. त्यामुळे या कोरीव चित्रांचा संबंध पूर्व-इतिहासातील आदिवासी प्रतीकात्मक संवाद प्रणालीशी असण्याची शक्यता आहे.

## आज समाज कल्याण मंत्र्याच्या उपस्थितीत समारोप

# संविधान डिबेटचे वाचन 56 तासात 65 अनूछेद







**नागपूर :** महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय, बार्टी प्रशासन व दिशा ह्यूमन वेल्फेआर असोसिएशन च्या संयुक्त विद्यमाने डॉ बाबासाहेब आंबेडकर इंटरनॅशनल कन्वेंशन सेंटर मध्ये 23 मे पासून संविधान डिबेट्सचे वाचन सुरू असून रविवारी सायंकाळी 6 पर्यंत 56 तासात 65 व्यक्तींनी 70 अनुच्छेदांचे वाचन केलेले आहे. उर्वरित अनुच्छेदाचे वाचन रात्रभर होणार आहे. संविधानाच्या हीरक महोत्सवानिमित्त आयोजित केलेल्या या ऐतिहासिक कार्यक्रमाचे 26 मे रोजी सायंकाळी 5 वाजता सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाठ व आंबेडकरी चळवळीतील बळवंत वराडे यांच्या परिवारातील मालती वराडे यांच्या प्रमुख उपस्थितीत समारोप होईल, अशी माहिती कार्यक्रमाचे मुख्य आयोजक वामन सोमकुवर व उत्तम शेवडे यांनी दिली. 24 मे रात्री व 25 मे ला दिवसभर डॉ. एम.एस. कळमकर, वर्षा टेंभेकर, प्रमिला थोरात, पल्लवी दाणीखान, अलका चौकीकर, दीक्षित आवळे, मनीषा जामगडे, कल्पना तेलंग, माया मोहाळे, मृणालिनी दहिवडे, संध्या मेश्राम, रोहित फुलझेले, सुहासिनी गायकवाड, सिद्धार्थ वाडकर, रोशन राऊत, एड विलास राऊत, ओजस्वी मेश्राम, भावेश गजभिये, ॲड. ज्योती वालदे, ॲड. विशाखा मेश्राम, जयंत साठे, नरेश महाजन, यशस्वी नंदनवार, प्रा. देवराव नंदनवार, सुन्नीलाल जांभूळकर, दीप्ती रंगारी, अजातशत्रू भगत, सुलभा चव्हाण, निर्मला वाघधरे, महिपाल सांगोळे, नरेश साखरे, ॲड. रमेश राठोड, निरंजन पाटील, अनिता धारगावे, दैनिक बहुजन सौरभच्या निवासी संपादक संध्या राजूरकर, प्रा. माधुरी गायधनी दुपटे, डॉ. मनीष वानखेडे, धर्मेश प्रसेनजित, प्रिती तिरपुडे, महेंद्र तिरपुडे, ज्योत्स्ना बनसोड, सुनयना खाडे, ज्योती बर्गड अमरावती, प्राची बोरकर, ओशीन कराडे, डॉ. सरोज डांगे, सुप्रिया घोडके आदींनी रात्रभर व आज दिवसभर डिबेट्सचे वाचन केले. यावेळी प.पू. डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती दीक्षाभूमि नागपूरचे सदस्य भंते नागदिपांकर, गिनीजबुक ऑफ वर्ल्ड रेकॉडचे परिक्षक मनिश पाटील प्रामुख्याने उपस्थित होते. या वाचनाची वैशिष्ट्य असे की वाचणाऱ्यांची संख्या अधिक वाढल्याने एक एक अनुच्छेद तीन-तीन व्यक्तींनी मिळून वाचन केले. एवढेच नव्हे तर कॉलेज मधील विद्यार्थी विद्यार्थिनींनी मराठी सोबतच हिंदी व इंग्रजी वाचनासाठी पुढाकार घेतला. रात्री तर वकिलांच्या टीमने वाचनात पुढाकार घेतला. रविवार असल्याने सभागृहात उपस्थितांची, श्रोत्यांची व वाचकांची उत्सुकता शिगेला पोहोचली होती.

## वाचकांना आवाहन



दैनिक बहुजन सौरभची नागपूर शहरात सतत मागणी वाढत आहे. आपल्या घरी जो पेपर देतो. त्यांच्याकडे दैनिक बहुजन सौरभची मागणी करावी. आमच्या वर्तमानपत्राची स्वतंत्र अशी कोणतीही वितरण व्यवस्था नाही.

दैनिक बहुजन सौरभ नागपूर शहरात सर्वच पेपर विक्री केंद्रावरती उपलब्ध आहे. याची वाचकांनी नोंद घ्यावी.

मुख्य संपादक
दैनिक बहुजन सौरभ

“ मोठेपणाने वागण्यासाठी अहंकाराचा त्याग करावा लागतो! ”

बहुजन सौरभ
BAHUJAN SAURABHA



## संपादकीय

# विश्वविक्रमी संविधान डिबेट्सचे 75 तास वाचन !

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आवडते शहर नागनगरी नागपूर आणि हो नागलोकांचे शहर, बदलते शहर, परिवर्तनीय शहर अशीच नागपूरची ओळख आहे. एकेकाळी मध्य प्रदेशची राजधानी नंतर 1960 ला महाराष्ट्र राज्याची उपराजधानी झाली. नागपूरने संविधानांची ओळख करून देण्याचा प्रयत्न केला आहे. ही ऐतिहासिक घटना म्हणता येईल. 26 नोव्हेंबर 1949 रोज भारतीय राज्य घटना स्विकारण्यात आली आणि भारतात लोकशाही मार्गाने कामकाज सुरू झाले. 26 जानेवारी 1950 पासून संपूर्ण भारतात गणराज्य दिन साजरा साजरा होऊ लागला आहे. मोठ्या आनंदात भारतीय संस्कृती आणि प्रगतीची ओळख सुरू झाली. 26 जानेवारीला देशाचा मोठा गणराज्य महोत्सव नवी दिल्ली साजरा होत असतो. पण संविधानाची ओळख सर्व सामान्य माणसाला होऊ शकली नाही तर संविधान साक्षरता अभियान सुरू करण्यात सरकार काही प्रमाणात मागे पडले पण संविधान संरक्षण संदर्भात जागरूक नागरिकांनी संविधानाच्या अनेक परिच्छेद, कलम, घटना दुरुस्तीवर चर्चासत्र घेऊन संविधान संरक्षण आणि ओळख अभियान राबविले आहे. संविधानाच्यानुसार न्याय मिळवून देण्यासाठी कार्य करणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे तर संसदेत ने विशेष अधिवेशन घेतले आहे.

**संविधान सुवर्ण महोत्सवी वर्ष** – भारतीय संविधान दि. 26 नोव्हेंबर 1949 ला स्वीकारण्यात आले. या घटनेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षात 1999 ला भारतीय घटनेची उद्देशिका, प्रास्ताविका जिल्हा परिषद अंतर्गत सर्व कार्यालयात, पंचायत समिती, ग्रामपंचायत व महत्त्वाच्या सार्वजनिक ठिकाणी लावण्यात आली. संविधान उद्दिष्टांचा प्रचार-प्रसार व्हावा, साक्षर जनतेला भित्तिपत्रके वाचून संविधानातील मुख्य गाभा, स्वातंत्र, समता, बंधुता, समान संधी आणि देशाची एकता व अखंडता अबाधित ठेवण्यास आम्ही सारे भारतीय लोक वचनबद्ध आहोत, ही जाणीव व्हावी म्हणून घटनेची उद्देशिका ग्रामपंचायतसह जिल्हा परिषदेच्या अधिकार क्षेत्रातील सर्व कार्यालयात लावण्याचा पहिला प्रयत्न वसंतराव खोब्रागडे मुख्य कार्यपालन अधिकारी वर्धा यांनी केला होता या कार्यात जिल्हा परिषद अध्यक्ष सिमिनती हातेकर यांचा सहभाग महत्त्वाचा होता. त्यानंतर नागपूर जिल्हा परिषदचे मुख्य कार्यपालन अधिकारी ई. झेड. खोब्रागडे यांनी संविधान वाचन उपक्रम शाळेतून सुरू करून हा उपक्रम महाराष्ट्र राज्याच्या सर्व शाळेत लागु झाला आहे. संविधान ओळख झाली तर संविधानातील न्याय, हक्क आणि अधिकार, कर्तव्य ही अमलबजावणी प्रभावीपणे होईल.

**भारतीय संविधान हीरक महोत्सव** – भारतीय संविधानाच्या हीरक महोत्सवी वर्षा निमित्त 75 तासात संविधान डिबेट्स मधील 75 कलमांवर चर्चेचे पठण करण्याचे कार्य सुरू झाले आहे. दि. 23 मे 2025 सकाळी 9.00 वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर इंटरनॅशनल कन्वेंशन सेंटर, कामठी रोड, नागपूर येथे संविधान अभ्यासक प्रा. देविदास घोडेस्वार यांच्या हस्ते या ऐतिहासिक उपक्रमाचे उद्घाटन झाल्यावर 8 तासात 15 व्यक्तींनी 15 कलमांच्या चर्चेचे वाचन केले. प्रा. देविदास घोडेस्वार यांनी उद्घाटकीय भाषणात सांगितले की भारत हा कधीच राष्ट्र नव्हता त्याला राष्ट्र बनवण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अनेक प्रयत्न केले. त्यानंतर 26 जानेवारी 1950 ला भारत हा राष्ट्र बनला. भारतीय संविधान हा व्हिजन डॉक्युमेंट आहे, फिलॉसॉफी आहे आणि मानवी उत्थानाचे तत्त्वज्ञान सुद्धा आहे, त्यामुळे भारतीय संविधानाचे रक्षण करण्याची जबाबदारी सर्व भारतीयांची असल्याचे मत त्यांनी याप्रसंगी व्यक्त केले. अत्यंत सूक्ष्मपणे अभ्यास करून 2013 ला संविधान डिबेट्स प्रकाशित करून ही त्यांची निर्मिती होय. लाखो रुपये खर्चून उभारलेल्या संविधान डिबेट्स ग्रंथ हा मोठा ऐतिहासिक दस्तावेज त्यांनी उपलब्ध करून दिली आहे. संविधान डिबेट्सला अभ्यासक आणि वाचकांनी चांगला प्रतिसाद दिला आहे. या भव्य कार्यक्रमात कांशीराम रिसर्च सेंटरच्यावतीने संविधान प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रदर्शनीत संविधानाच्या इंग्रजी व हिंदीतील मूळ प्रति, तसेच कॉन्स्टिट्यूएन्ट असेंबली डीबेट्सच्या इंग्रजी, हिंदी, मराठीतील प्रती व भारतीय संविधानाच्या विविध प्रकाशकांनी काढलेल्या विविध प्रकारच्या प्रती उपलब्ध आहेत. या ऐतिहासिक उपक्रमाचे ग्रिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद घेण्यासाठी सुद्धा टीम आलेली आहे. दिनांक 26 मे 2025 पर्यंत वाचन चालणार आहे. आयोजक वामन सोमकुवर, उत्तम शेवडे, अॅड. अस्मिता तिडके, सुनील गजभिये, प्रदीप कराडे, गौतम पाटील, चंद्रकांत सोमकुवर, माया उके, वर्षा सहारे, हृदय गोडबोले, रवी गजभिये यांची धडपड कौतुकास्पद आहे. बार्टीचे वाळके, गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डचे जुरी (परीक्षक) मनीष पाटील व कार्यक्रमाचे मुख्य आयोजक वामन सोमकुवर विशेष लक्ष केंद्रित करून आहेत. डिबेट वाचनाचा उपक्रम रात्रंदिवस सुरू असून 26 तारखेच्या सायंकाळी 4 पर्यंत राहणार आहे. वाचकांसाठी डिबेट्सचे खंड उपलब्ध करून देण्यात आले आहे. सामाजिक न्याय विभाग, बार्टी प्रशासन व दिशा ह्युमन वेल्फेअर सोसायटी, दि बुद्धिस्ट गोल्डन इरा वुमेन्स फाउंडेशन आदी संस्थानी विशेष सहकार्य केले आहे. संविधानाचा हीरक महोत्सव लोकसहभागातून होत आहे ही आनंदाची आणि कार्यकर्त्यांना बळ देणारी बाब आहे. ■ ■

बहुजन सौरभ

---

# चितेगावची स्वाभिमान परिषद

**चितेगाव ता. निफाड येथे भरलेल्या महार परिषदेला डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वतः हजर होते. या परिषदेचे सर्वात मोठे आकर्षण म्हणजे नारायण पोपट कदम यांची आई सखूबाई हिने बाबासाहेबांना चितेगावच्या वेशीत कपाळावर ललाटी टिळा लावून ओवाळले होते. त्या ऐतिहासिक स्वाभिमान संरक्षण परिषदेला आज, 26 मे 2025 रोजी 96 वर्षे पूर्ण झाली आहेत निमित्ताने...**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शतकानुशतके चालत आलेली सामाजिक विषमता, अन्यायाच्या उच्चाटनासाठी आणि महार वतने नष्ट करण्यासाठी स्वाभिमान चळवळ उभी केली होती. सामाजिक स्वाभिमानाखेरीज राजकीय स्वाभिमान जागृत होणार नाही. कारण स्वाभिमान ही पवित्र भावना आहे. महार वतनाच्या गुलामगिरीतून अस्पृश्यता नष्ट केल्याशिवाय त्यांचा स्वाभिमान जागा होणार नाही. निर्भयतेने, आत्मविश्वासाने अस्पृश्य समाज चळवळीत उतरणार नाही याची जाणीव डॉ. बाबासाहेबांना होती. जनजागृती करण्यासाठी बाबासाहेबांनी दादासाहेब गायकवाड यांची निवड केली होती. लगेचच दादासाहेबांनी चितेगाव, ता. निफाड, जि. नाशिक या ठिकाणी रविवार 26 मे 1929 रोजी स्वाभिमान संरक्षण परिषदेचे आयोजन केले. खेरवाडी रेल्वे स्टेशनजवळच ही ऐतिहासिक परिषद भरली होती.
अध्यक्षस्थानी डॉ. बाबासाहेब आंबेडकर होते. परिषदेला जवळपास सहा हजार प्रेक्षक व प्रतिनिधी जमले होते. नाशिकहून प्रो. सबनीस, मेसर्स गायकवाड, शेट रणखांबे, काळे वगैरे मंडळी, देवळालीहून स्वयंसेवकाचे पथक आणि मुंबईहून समता पत्रकाचे संपादक देवराव विष्णु नाईक, समाज समता संघाचे मेसर्स द. वि. प्रधान, रा. कवळी, भा. वि. प्रधान, भो. बा. देशमुख, शं. शां. गुप्ते, भा. र. कद्रेकर वगैरे मंडळी आली होती. स्वागताध्यक्ष रोकडे शेट आजारी असल्यामुळे त्यांचे भाषण होऊ शकले नाही.





अध्यक्ष डॉ. आंबेडकर यांनी आपल्या भाषणात सांगितले की, ‘‘हीन परिस्थितीतून मुक्त होण्यासाठी अस्पृश्य बांधवांनी आपला स्वाभिमान जागृत करून, माणुसकीच्या हक्कासाठी निकराचा हल्ला चढविला पाहिजे. नुसत्या शिक्षणाने माणुसकी मिळती तर वरिष्ठवर्गासारख्या सुशिक्षित वर्गाकडून आम्हा अस्पृश्य बांधवांवर या सुधारणेच्या काळात अन्यायाचे अत्याचार झाले नसते. हिंदुसमाजाने निष्कारण आपला दर्जा हीन ठरविला आहे. हा हीनत्वाचा कलंक धुऊन काढण्याकरिता मला हा स्वाभिमान जागृतीचा मार्ग योग्य असा वाटत आहे. एवढ्याकरिता माझ्या बांधवांनो, स्वाभिमान जागृत ठेवा. आपणावर होत असलेल्या अन्यायी जुलुमाविरुद्ध बंड पुकारल्याशिवाय आपल्याला खीया माणुसकीचे हक्क प्राप्त होणार नाहीत.’’
बाबासाहेबांच्या भाषणानंतर पुढील आशयाचे ठराव पास करण्यात आले. 1. बादशहा पंचम जॉर्ज यांची प्रकृती सुधारल्याबद्दल आनंद प्रदर्शन. 2. जन्मावरून कोणासही श्रेष्ठ किंवा हीन न समजणे. वेद, शास्त्रे, पुराणे व इतर धर्मग्रंथ यात जन्मावरून उच्चनीचत्व प्रतिपादन केले असल्यामुळे या ग्रंथांचा अधिकार न मानणे आणि असले ग्रंथ जप्त करणे. 3. राष्ट्राच्या प्रगतीकरिता व समता प्रस्थापित करण्याकरिता अस्पृश्यतेची रूढी नष्ट करणे. 4. अल्पवयी मुलींची लग्ने करू नये. 5. अस्पृश्याच्या आर्थिक उन्नतीसाठी सरकारने पडीत जमिनी सवलतीने द्याव्या. 6. हॉटेल व खाणावळी इत्यादी ठिकाणी अस्पृश्य वर्गाला व इतर कनिष्ट वर्गाला मज्जाव नसावा.
परिषदेचे सेक्रेटरी रामचंद्र राणोजी पवार आणि स्वागताध्यक्ष म्हणून संभाजी रोकडे शेठ होते. परिषद यशस्वी करण्यासाठी शंकरदास बुवा, सेक्रेटरी आर.आर. पवार, दिवाकर नेवाजी पगारे यांनी पुढाकार घेतला होता. चितेगावचे शंकरदास बुवा यांनी भोजनाची खास व्यवस्था केली होती. कार्यकर्त्यांच्या राहण्याची व्यवस्था खेरवाडी रेल्वे स्टेशनवर प्लॅटार्मवरच करण्यात आली होती. सदर परिषदेला त्याकाळचे निडचे मामलेदार के. डब्ल्यू. पाठक सरकारकर्ते परिषदेचा वृत्तांत आणि अहवाल ऐकण्यासाठी आवर्जून आले होते. सोबतच मराठा समाजाचे भी. म. कदम, जयरामबुवा बर्वे, माधव पर्वतराव देशमुख आणि वामन गंगाराम कदम इ. पुरोगामी विचारांचे नेतेही प्रामुख्याने हजर होते.
त्या काळात दलित समाजाप्रमाणेच मराठा समाजही मुख्यत्वेकरून अंधश्रद्धा, कर्मकांड, ज्योतिष-कुंडली, गोत्र, पत्रिका या परंपरेच्या मानसिक गुलामगिरीत जखडला होता. मराठा स्त्री-पुरुषांच्या गुलामगिरीत, दास्यत्वाच्या बंधनात अडकला होता. त्यावेळी आपल्या सामाजिक बदलाचा वसा हाती घेऊन, घराचा उंबरठा ओलांडून आणि हळदी कुंकवाचे ताट हातात घेऊन चितेगावच्या नारायण पोपट कदम यांची आई सखूबाई (96 कुळी मराठा स्त्री) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना ओवाळण्यासाठी पुढे सरसावली होती. अनेक अडचणीचा सामना करून सखूबाईने आपली आत्मशक्ती, निर्भयता, विचारांची प्रगल्भता आणि निश्चय पक्का करून बाबासाहेबांच्या समता विचारांचा पुरस्कार केला होता. त्या काळचे ते फार मोठे धाडस होते. डॉ. बाबासाहेब काळ्या मोटारीतून उतरले. डॉ. बाबासाहेबांना वेशीत येताना सखूबाईने पाहिले. वेस म्हणजे गावकुसाचा मोठा दरवाजा, गावाचे प्रवेशद्वार! वेशीचे साक्षीदार माधवराव पर्वतराव देशमुख, परशराम शिवराम शेलार आणि वामन गंगा कदम होते. प्रवेशद्वारावरच सखूबाईने डॉ. बाबासाहेबांना ललाटी कुंकवाचा टिळा लावून विलक्षण श्रद्धाभावनेने ओवाळणी केली. त्यावेळी डॉ. बाबासाहेबांनी सखूबाईला साडीचोळी भेट म्हणून दिली. तो विलोभनीय देखावा पाहून अनेकांच्या डोळ्यात आनंदाश्रू आले होते. 96 कुळी मराठ्याच्या सुनेला ती साडीचोळी कशी व किती भावली असेल हे सांगायला 1929 सालची सखूबाई आज आपल्यात नाही. 96 कुळी मराठा महिला आणि स्वाभिमान परिषदेची 96 वर्ष असा विलक्षण योगायोग 2025 साली जुळून आला आहे.
स्वाभिमानी परिषदेच्या संस्मरणीय आठवणी आजही जिवंत आहेत आणि त्या युगानुयुगे दलित, वंचित, बहुजन समाजाला स्वाभिमानाने जगण्याची सदैव प्रेरणा देत राहतील. या ऐतिहासिक परिषदेची दखल खुद्द डॉ. बाबासाहेबांच्या ‘बहिष्कृत भारत’ (21 जून 1929) साप्ताहिकाने घेतली होती हे विशेष उल्लेखनीय. चितेगाव स्वाभिमान परिषदेच्या 96 व्या वर्धापन दिनानिमित्त सर्वांना हार्दिक शुभेच्छा. ■ ■



मिलिंद मानकर
मो. 8080335096

---

# ऊर्जा देणारा वास्तववादी शब्द म्हणजे जयभिम

जयभीम का नारा गुंजेगा, देश के कोने कोने मे! आता देशाला नाही तर संपूर्ण जगाला जयभिम हा शब्द माहित झालेला आहे. जयभीम हा शब्द एल. एन. हरदास नागपूर यांनी पहिल्यांदा उच्चारला आणि पहाता, पहाता इतका प्रचलित झाला की संपूर्ण देशात जयभिम लोक मोठ्या अभिमानाने बोलायला लागले. जयभीम म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा सन्मान करणे म्हणजे जयभिम होय. एखादा व्यक्ती समोरून येत आहे तर त्याला दुसरी व्यक्ती जयभिम म्हणत असेल तर ते त्याचा सन्मान करतात असा त्याचा अर्थ होतो. त्याचबरोबर त्या वेळेस ती व्यक्ती डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा ही एकप्रकारे आदर करतात असा त्याचा अर्थ होतो. या जयभिम बोलण्यामुळे दोन व्यक्तीमध्ये एक वैचारिकता असल्याचे जाणवते. त्याच्यात चांगुलपणा असल्याचा प्रथम दर्शनी भास होतो आणि अंतिमही क्षणापर्यंत चांगले राहण्याचा त्याचा संकल्प असतो असे जाणवते. आता जयभिम हा शब्द लोकांच्या हृदयात पोहचला आहे. या जयभिम शब्दामुळे काही लोकांना धडकी भरायला लागली आहे. त्यामुळे ते वाह्यात सारखे बोलायला लागले आहे. त्यांना वाटते जर जयभिमचा खऱ्या अर्थाने अर्थ लोकांना कळला आणि त्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितलेल्या मार्गाने हा भारतीय समाज मोठ्या प्रमाणात गेला तर आमच्या मंदिरातील पुजारी यांचे ऐकेल कोण? ही भीती काहींना आहे. म्हणून काही जयभिम या शब्दाचाच विरोध करू लागले. त्यांना हे माहित नाही की डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला संविधान दिले. त्यामुळे सर्वांना समान न्याय मिळाला, स्वातंत्र्य मिळाले, विषमता दूर झाली, आर्थिक उन्नती झाली, सामाजिक प्रतिष्ठा वाढली. देशाची प्रतिष्ठा वाढली. आज संपूर्ण जगात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना जागतिक विद्वान म्हणून ओळखले जाते. अमेरिकेत तर कोलंबीया विद्यापीठाणे अगदी विद्यापीठा समोर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा 72 फुटाचा पुतळा बसवीला आहे आणि त्या खाली सिंबॉल ऑफ नॉलेज ज्ञानाचे प्रतीक म्हणून लिहल्या गेले आहे. त्या विद्वान महापुरुषाचे नाव म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर आहे. त्याचा सन्मान करणे म्हणजे जयभीम होय. जयभिम हा शब्द दोन अर्थाने वापरला जातो, एक डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा सन्मान ही करण्याच्या हेतूने आणि समोरील व्यक्तीचा आदर करण्याच्याही दृष्टीने वापरला जातो. हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा द्वेष करणाऱ्या माणसाने समजून घेतले पाहिजे. मागे संसदमध्ये आपल्या देशाचे सन्माननिय गृहमंत्री अमित शहा यांनी आंबेडकर, आंबेडकर, आंबेडकर यह बोलना तो फॅशन हो गयी है! इतनी बार अगर तुम भगवान का नाम लेते तो सात जन्म तक स्वर्ग मे जगा मिल जाती. असे वाक्य एक प्रकारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची खिल्ली उडविण्याच्या दृष्टीने बोलले असे संसद सदस्य यांना वाटले आणि सर्वांनी जयभिम, जयभिम, जयभिम असा नारा दिला तो नारा सर्व समावेशक होता. जात, पात, धर्म याही पलीकडे जाऊन त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सन्मानार्थ घोषणा दिल्या आणि गृहमंत्री अमित शहा यांनी माफी मागावी असा सर्व समावेशक सुरु निघाला आणि संपूर्ण देशातून मोर्चे निघाले. अनेक विधानसभामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सन्मानार्थ भाषणे झाली, अनेक ठिकाणी निषेध सभा झाल्या, मोर्चे झाली, रास्ता रोको आंदोलने झाली, धरणे आंदोलने झाली ती डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबद्दल अपमान जनक टिप्पनी केल्यामुळे झाली हे अलीकडील चार महिन्यापूर्वी घडलेली घटना आहे. त्यामुळे कोणीही जयभिम या शब्दाची खिल्ली उडविण्याचा प्रयत्न करू नये. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अपमान करू नये. डॉ. बाबासाहेब जागतिक विद्वान आहे, ते अनेकांच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, या सर्व बाबतीत प्रगती करणारे आधार स्तंभ आहे. अनेकांचे ते प्राण आहे. ते भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार आहे. प्रसिद्ध समाज सेवक होते. ते समानतेचे पुरस्कर्ते होते. त्याच्या सन्मानार्थ जयभिम हा शब्द आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 14 ऑक्टोबर 1956 ला बुद्ध धम्मालची दिक्षा घेतली आणि स्वतः बावीस प्रतिज्ञा केल्या. पुढे पाच लाख त्याच्या अनुयायांना त्यांनी तशी इच्छा व्यक्त केल्याने बुद्ध धम्माची दिक्षा दिली आणि बावीस प्रतिज्ञा दिल्या आणि ते बुद्ध विचारधारेने जाण्यासाठी कटीबद्ध झाले. ते सनदशीर मार्गाने जाण्याचा निर्धार करू लागले. लोकांना सत्य सातत्याने सांगू लागले.





काहींना वाटले आपले पितळ उघडे पडेल ही भीती त्यांना वाटू लागले आणि त्यानी षडयंत्र करून लोकांच्या मनात कलुशीत भावना उत्पन्न निर्माण केली आणि पुन्हा आपसात संघर्ष करायला लागले आणि भारतीय समाजाची प्रगती पाहिजे. त्या प्रमाणात न होता बाधा आली. ही वास्तविकता केव्हा हा भारतीय समाज समजू शकेल सांगता येत नाही. पण जोपर्यंत वास्तव हा भारतीय समाज समजणार नाही तोपर्यंत तो अन्यायाच्या विरोधात उभा ठाकणार नाही. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, गुलामाला, गुलामीची जाणीव करून द्या. म्हणजे तो आपोआपच बंड करून उठेल या सर्व अर्थाने जयभिम म्हणून सन्मान पूर्वक बोलणाऱ्या प्रत्येक माणसाची जबाबदारी आहे ती ही की भारतीय राज्य घटनेचे संरक्षण करणे आणि राज्य घटनेचे राज्य निर्माण करणे. ते जर खऱ्या अर्थाने झाले तर खऱ्या अर्थाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिप्रेत असणारा समाज निर्माण झाला असा त्याचा अर्थ होईल आणि सर्व भारतीय समाज सुखी होईल. भ्रष्टाचार मुक्त भारत, द्वेष मुक्त भारतीय समाज, शोषण मुक्त समाज, निर्माण करण्याच स्वप्न जे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे होते ते पूर्ण होईल. म्हणजे पूर्ण भारतीय समाज सन्मानपूर्वक जयभिम म्हणेल. तेव्हा खऱ्या अर्थाने ‘ऊर्जा देणारा वास्तववादी शब्द म्हणजे जयभीम’ होईल. त्यासाठी जयभिम म्हणणाऱ्या प्रत्येकाने संकल्प करून काम केले पाहिजे. ■ ■



अविनाश टिपले
मो. 9970917389

---

# ‘भस्मांचल’ नाटक नसून एक आंदोलन





*84 जीवो मे केवल मानव ही धन कमाता है !*
*एक भी जीव भुका नही मरता हैं !*
*मानव का मात्र कभी भी पेट नही भरता हैं !*

माझा मोठा मुलगा आणि सुनबाई अमेरिकेत आहेत. छोटा मुलगा आणि सुनबाई ऑस्ट्रेलियात आहेत. मुलगी आणि जावई कॅनडात आहेत. भाऊ आणि वहिणी लंडनला आहेत. मी आणि माझी पत्नी मात्र वृद्धाश्रमात आहे. धन कमविण्याच्या नादात नातीगोती नुसती विसरली जात नाहीत. तर कायमची तुटली जातात. उच्च शिक्षित असूनही आई वडील यांच्या आजारपणात नाही. पण आपणाला सोडून गेली त्यांचा शेवटचा अंत्यविधीला देखील येण्यास वेळ नसतो. मुल बाळ असूनही बेवारशी असल्या सारखे जाणे उघड्या डोळ्याने पाहून देखील संपूर्ण समाज मौन बाळगतो, परंतु काही मोजके कलाकार उठून सत्याचे रणशिंग फुंकतात. असेच एक धाडसी पाऊल उचलले आहे सुप्रसिद्ध दिग्दर्शक हर्षल राणे यांनी! ‘भस्म हो रहा है माँ का आँचल’ या भेदक विचाराने जन्म घेतलेल्या ‘भस्मांचल’ या नाटकाच्या माध्यमातून, हर्षल राणे यांनी आजच्या समाजाला डोळे उघडायला भाग पाडले आहे.
वृद्धाश्रमात आपली शेवटची श्वास घेणारी आई-वडील, अनाथालयात गुपचूप रडणारी निरागस लेकरे - या सर्वांचा आर्त हुंदका त्यांनी रंगमंचावर जिवंत केला आहे. या विषयावर नाटक करणे केवळ एक कला नव्हे, तर एक सामाजिक जबाबदारी आहे आणि ही जबाबदारी अत्यंत संवेदनशीलतेने पार पाडली आहे. 25 हून अधिक कलाकारांचा समावेश असलेले हे नाटक केवळ एक नाट्यप्रयोग नाही, तर वास्तवाच्या छायेत साकारलेले क्रांतिकारी आंदोलन आहे.
लेखक मोहन नायर यांच्या लेखणीतून उतरलेली ही कथा, आणि हर्षल राणे यांचं सर्जनशील दिग्दर्शन - यांची संगती इतकी प्रभावी आहे, की प्रेक्षक हलतो, विचारतो आणि स्वतःला आरशात पाहतो. कारण हा प्रश्न विदेशी असलेल्या मुलांचाच आहे असा नाही. तर एकत्र कुटुंब पद्धती हरवलेल्या सर्व समाज थरात वाढलेला आहे. समाजात नाती गोती हरवत चाललेली आहेत. नैतिकता लोप पावत असल्याने कुटुंब म्हणून इतक्या जटिल समस्या निर्माण झाल्या आहेत की त्या सोडविण्यासाठी हा नाट्यप्रयोग सामाजिक साखळीत एक नवा क्रांतिकारी धागा विणतो आहे. ‘भस्मांचल’ हे नाटक नाही, हे एक आंदोलन आहे. आईवडिलांच्या अश्रूंना आवाज देणारे व्यासपीठ आहे. हर्षल राणे यांचे हे पाऊल केवळ कौतुकास्पदच नाही, तर समाजासाठी प्रेरणादायी संदेश देणारे आहे! एक विदारक, जागृती निर्माण करणारे आणि अंतर्मनाला हलवून टाकणारे नाट्यप्रयोगाला यशस्वी करण्यास पुरोगामी परिवर्तनवादी मीडियाने देखील सहकार्य करण्याची गरज आहे. कारण मायेच्या आंचलावरती जमलेली राख आणि त्या राखेतून पेटलेली जागृती!’ डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, जागृतीचा विस्तव अखंडपणे तेवत ठेवा. आम्ही येतोय तुमच्या मनातल्या प्रश्नांना उत्तर द्यायला ‘भस्मांचल’लवकरच रंगमंचावर येत आहे. माझे मित्र वामन वाघमारे यांची त्यात फार महत्वाची भूमिका आहे. हे नाटक जाती धर्माच्या बेड्या तोडून नात्यागोत्याचा आणि एकत्र कुटूंब पद्धतीचा विचार करायला लावणारे आहे. ■ ■



आनंद म्हस्के
मो. 8652325032

---

## बहुजन मानस





नागेश चौधरी (बहुजन विचारवंत)
9970873560

# भारत : एक संघराज्य की राज्यांचा संघ !

हा देश एका केंद्रीय सत्तेच्या हातात असावा की तो राज्यांद्वारे चालावा यावर संविधान सभेत बरीच चर्चा झालेली आहे. त्या चर्चेच्या परिणतीचे फळ म्हणजे आज आपणास सत्तेची दिसत असलेली अवस्था वा स्थिती आहे. आज देशात जी सत्ता आहे ती या दोन पैकी कुठल्या भूमिकेवर भर देत आहे, याचा विचार केला तर हा देश एका सत्तेच्या अधीन असावा अर्थात, एकसंघ युनिटरी असावा या भूमिकेचे समर्थनच नव्हे तर अवलंबन करणारी आहे. या देशात जी विभिन्न राज्ये आहेत, जी 1956 च्या राज्य पुर्नरचनेनंतर अस्तित्वात आली ती राज्ये देखील आजची सत्ता ज्या रा.स्व.संघाच्या नीतीप्रमाणे चालत आहे त्या संघाला राज्य पुर्नरचना देखील मान्य नव्हती. या संदर्भात त्या वेळचे संघचालक मा.स. गोळवलकरांनी काय मत मांडले होते ते पाहायला हवे. त्यांनी ‘बंच ऑफ बॉटस्’ या पुस्तकात राज्य पुर्नरचनेचा विरोध केला आहे. (प्रकरण XVIII, पा. 222- 24) म्हणजे हा देश राज्यात विभाजित करू नये. रा.स्व. संघाला भारत देश एक संघ हवा. राज्यांचा संघ नको आणि त्या दिशेने आजच्या भाजप सत्तेची वाटचाल सुरू आहे. आपल्या देशाचे संविधान है युनिटरी-एकसंघ की फेडरल, राज्यांचा समुदाय आहे यावर संविधानात स्पष्टता नाही. म्हणजे हे संविधान अमेरिकी संविधानाप्रमाणे फेडरल नाही. अर्थात, राज्यांना तेवढे स्वातंत्र्य वा स्वायत्तता नाही. हे संविधान म्हणून जास्त युनिटरी आहे असे म्हणतात.
रा.स्व. संघाने सुरवाती पासूनच राज्य एकसंघ युनिटरी असावे अशी भूमिका घेतली होती आणि ही भूमिका गोळवलकरांच्या मांडणीत दिसून येते.





मा.स. गोळवलकरांनी लिहिलेल्या ‘बंच ऑफ थॉटस्’ या पुस्तकात ‘वांटेड ए युनिटरी स्टेट’ हे प्रकरण आहे आणि त्यात एकसंघ राज्य हवे राज्यांचा संघ प्रकार नको असे ठामपणे म्हटले आहे. अर्थात फेडरल म्हणजे राज्यांचा संघ अशी रचना नसावी. राज्यांना वेगळे अधिकार नसावेत.
ते लिहतात, ... The most important and effective step will be to bury deep for good all talk of federal structure of our country's constitution, to sweep away the existence of all 'autonomous' or semi aute states' within the onestate viz.... Bharat and proclaim 'One country, One state, One legislature, Onc Executive' with no trace of fragmental, regional, sectarian, linguistic or other types of pride being given a scope for playing havoc with our integrated harmony-"p-227
अर्थात, संविधान फेडरल किंवा राज्यांना स्वातंत्र्य वा स्वायत्तता नसावी अशी भूमिका घेतली होती आणि पुढे म्हटले आहे की असे जाहीर करण्यात यावे की भारत एकदेश, एकराज्य, एककायदे मंडळ, एक कार्यकारी मंडळ याप्रमाणे राहावा ज्यात अलग प्रादेशिकता, वेगळी भाषा वा अन्य प्रकारची वेगळी सुभेदारी राहणार नाही ज्यामुळे आमच्या एकात्मरचनेला धोका पोचणार नाही. गोळवलकरांनी त्याच प्रकरणात या देशातील भेद जे धर्मावरून आहेत, आर्य, द्रविड म्हणून आहेत वा ब्राह्मण-अब्राह्मण (बहुजन) म्हणून आहेत किंवा जैन, बुद्ध, सिख म्हणून धर्म आधारित आहेत ते अमान्य करायला हवे. कारण त्यामुळे देशाची एकता दिसत नाही. हे भेद उघड करण्यात इंग्रजी शासन कारणीभूत आहे. (पा.223), म्हणजे इथे जी जातीची उतरंड आहे, मुस्लिम आदी जे धर्म आहेत, आदिवासी आहेत त्या सर्वांचे वेगळेपण, वेगळे अस्तित्व आहे ते अमान्य करायचे आहे आणि त्याऐवजी हा देश एकमुखाने, गुण्यागोविंदाने जगत आहे हे बिंबवण्याचा हा हेका आहे आणि ही मांडणी रा.स्व.संघ आजही करत आहे आणि ती भूमिका प्रत्यक्षात उतरवण्यासाठी भाजपची सत्ता राबत आहे. आज मोदीची, भाजपची सत्ता आहे ती प्रत्यक्षात संघाची वा संघ नियंत्रित सत्ता आहे आणि म्हणून जे काही निर्णय घेतले जातात ते संघाच्या भूमिकेनुसार असतात, आहेत. काश्मीरला असलेला वेगळा दर्जा नको हे गोळवलकरांनी त्यांच्या पुस्तकात मांडले आहे आणि त्या निर्देशानुसार मोदी, भाजप सरकारने 370 कलम बरखास्त करून काश्मीरचे वेगळे अस्तित्व नष्ट करुन राज्यांचा संघ एक प्रकारची फेडरल स्थिति बर्खास्त करुन युनिटरी (एकसंघता) स्थिती निर्माण करण्यासाठी पाऊल उचलले. गोळवलकरांची भूमिका प्रत्यक्षात आणली.

**राज्यांचे अधिकार नष्ट करणे –**
राज्यांची स्वायत्तता किंवा त्यांचे अधिकार कमी करण्यासाठी या सरकारने जणू मोहीम उघडली आहे. 1. जीएसटी अर्थात देशासाठी एक कर लावणे, हा राज्यांच्या आर्थिक अधिकारांवर हल्ला आहे. LUMINOUS. 2. शेतीसंबंधी राज्यांचे अधिकार काढून टाकले आहेत. 3. समान नागरी कायदा हा प्रकार सुद्धा गोळवलकरी मांडणीतील आहे. 4. नवीन शिक्षण नीती ही केंद्राच्या ताब्यात करणे. ही जी वाटचाल आहे ती राज्यांचे अधिकार उत्तरोत्तर कमी-कमी करण्यासाठी आहे. विरोधी वा वेगळ्या विचारांचे राजकीय पक्ष याचा विरोध करतील म्हणून संपूर्ण देशात, सर्व राज्यात भाजपची सत्ता कशी येईल यासाठी आक्रमकपणे प्रयत्न होत आहे आणि रा.स्व.संघ यासाठी भक्कमपणे भाजपच्या पाठीशी आहे. निवडणुकीत आक्रमकपणे भाजपचा प्रचार करीत आहे. एकसंघ राज्य-युनिटरी राज्य रचना असणे म्हणजे एकदेश, एकधर्म, एकसंस्कृती, एक भाषा ही जी हिंदू राष्ट्राची संघाची राष्ट्र भूमिका आहे ती बिनधोकपणे अमलात आणायची आहे. या प्रकाराच्या विरोधात एव्हाना आवाज उठायला लागले आहेत. तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांनी केंद्र राज्य संबंधाबाबतच्या सेमिनारमध्ये बोलताना केंद्र सरकार कशाप्रकारे राज्यांचे अधिकार कमी करत आहे, काढून घेत आहे याची यादीच दिली आहे. ते म्हणाले, ‘आपल्या राज्यघटनेच्या स्थापकांनी एकसंघ, अखंड सरकार निर्माण केले नाही. अधिकार आणि कार्ये तीन भागांमध्ये विभागली आणि त्यांना राज्य सूची, समवर्ती सूची आणि संघ सूची अंतर्गत ठेवण्यात आले. पंचायत राज कायदा मंजूर झाल्यानंतर स्थानिक स्वराज्य संस्थांना अधिकार देण्यात आले आणि अधिकारांचे हस्तांतरण करण्यात आले. म्हणून, मी खेडी वाढली पाहिजेत आणि गावांच्या वाढीसह राज्ये वाढतील आणि राज्यांच्या वाढीसह राष्ट्र विकसित होईल. केंद्र सरकार भारतातील गावे आणि राज्ये उद्ध्वस्त करण्यावर टपले आहे. हे संविधान विरोधी आहे. केंद्र सरकारने राज्यघटनेने परिभाषित केलेल्या अधिकारक्षेत्राचे उल्लंघन केले आहे आणि आपल्या अधिकारक्षेत्राचा व्याप वाढवण्याच्या हेतूने अतिक्रमण करत आहे. इंग्रजांनीही आताच्यासारखी सर्वशक्तिमान एकात्मक-एकसंध रचना निर्माण केली नाही.

क्रमशः ■ ■

“ मूल्ये आपल्या व्यक्तिमत्त्वाला तेज देतात. ”



*माता रमाई (जन्म 1898 ते मृत्यू 1935) या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पहिल्या पत्नी तर डॉ. सविता कबीर उर्फ माईसाहेब (जन्म 1909 ते 2003) या त्यांच्या दुसऱ्या पत्नी! मुंबईतील भायखळा मार्केट मधील मच्छी बाजारात दि.4 एप्रिल 1906 रोजी भीवाचा रमाईशी विवाह संपन्न झाला. बाबासाहेबांचा दुसरा विवाह डॉक्टर, लेखिका, सामाजिक कार्यकर्त्या शारदा कबीर तथा सविता यांच्याशी 15 एप्रिल 1948 रोजी नोंदणी पद्धतेने मुंबईतच झाला.*

# माता रमाई आणि माईसाहेब

माता रमाई आणि माईसाहेब हे बाबासाहेबांच्या आयुष्यातील दोन अविभाज्य अध्याय! माता रमाई आणि बाबासाहेबांचे सहजीवन 1907 ते 1935 असे अठ्ठावीस वर्षाचे तर, माईसाहेब सोबतचे सहजीवन 1948 ते 1956 असे अवघे आठ वर्षाचे! रमाईचा त्याग, संघर्ष व योगदानामुळे डॉ.बाबासाहेब आंबेडकर शून्यातून जग निर्माण करु शकले. तर माई साहेबांच्या योगदानामुळे बाबासाहेबांनी क्रांतिकारी इतिहासावर कळस चढवला. माता रमाई आणि माई या दोघीही बाबासाहेबांच्या संघर्षमय जीवनात शक्तिस्त्रोत होत्या. रमाईच्या जीवनकाळात बाबासाहेबांनी एम.ए; एमएससी, पीएच.डी, डी.एससी. बॅरिस्टर इन लॉ सारख्या जागतिक किर्तीच्या पदव्या प्राप्त केल्यात. 1919 साली साऊथ ब्यूरो कमीशन समोरील साक्ष संपूर्ण अस्पृश्यांच्या जीवनाला कलाटणी देणारी ठरली, 1924 साली बहिष्कृत हितकारिणी सभा, 1927 साली समता समाज संघटनेची स्थापना (पुढे समता सैनिक दल बनले), 1920 ते 1927 च्या दरम्यान कोल्हापूर संस्थानातील माणगाव परिषद, नागपूर येथील राजर्षी शाहू महाराजांच्या उपस्थितीत दोन ऐतिहासिक परिषदा, महाड येथे 19 आणि 20 मार्च 1927 रोजी झालेला धर्मसंगर, 25 डिसेंबर 1927 रोजी मनुस्मृती दहन, 1930 ते 1935 या काळात नासिकचा काळाराम मंदिर सत्याग्रह या सारख्या घटनांनी बाबासाहेबांचा जीवनप्रवास थक्क करणारा आहे. बाबासाहेबांनी मुकनायक, बहिष्कृत भारत, समता, जनता या सारख्या नियतकालिकांतून स्वाभिमानी समाज उभा केला, यात माता रमाईचा सहभाग आहे. देशाला नवीन पहाट देणाऱ्या 1930 ते 1933 च्या लंडन येथील गोलमेज परिषदा, त्यातून स्वतंत्र मतदार संघाचा संघर्ष, 1932 मधील पुणे करार यासारख्या अनेक घटना-घडामोडींनी भरलेला बाबासाहेबांचा जीवनप्रवास रमाई सोबतचा होता.

माता रमाईच्या संघर्षमय जीवनाचे फलीत म्हणजे सुभेदार रामजींचा भिवा 'बाबासाहेब' बनून दलितांचा मसिहा बनला. रमाईशी बोलतांना बाबासाहेब 'रामू' आणि विदेशात असतांना पत्रातून 'प्रिय रामू' असा उल्लेख करत असत. विदेशात जाण्यापूर्वी बाबासाहेबांचे सहकारी मित्र बळवंत वराळे यांच्याकडे रमाईस हवापालट करण्यासाठी पाठवत असत. बळवंत वराळे यांच्या सहचारिणी राधा यांच्याशी रमाई मोकळेपणाने बोलत असत. राधाबाई रमाईस आईसाहेब म्हणत असत. रमाईच्या संघर्षमय जीवनाबद्दल बळवंत वराळे लिहितात की, 'आपण सहन केलेल्या हाल अपेष्टांची हकिकत रमाई हसत हसत राधाबाईस सांगायच्या आणि राधाबाई रडत रडत ऐकायच्या.' जातांना राधाबाईंच्या गळ्यात गळा घालून रमाई रडायच्या. धारवाडच्या हॉस्टेलमधील लहान मुले उपाशी असल्याचे लक्षात येताच रमाईंनी आपल्या हातातील सोन्याच्या बांगड्या मोडायला मागेपुढे पाहिले नाही. बाबासाहेबांच्या सार्वजनिक जीवनात माता रमाई स्थितप्रज्ञेने संसार करत राहिल्या. एका पाठोपाठ चार अपत्यांचा झालेला मृत्यू, रात्रंदिवस बाबासाहेबांच्या आरोग्याची चिंता, संसारासाठी उपसलेले अपार कष्ट व उपासतापास या साऱ्यांमुळे त्यांना स्वतःच्या प्रकृतीकडे लक्ष देण्यासाठी वेळच मिळाला नाही. शेवटी जे व्हायचे तेच झाले. त्यागमूर्ती माता रमाईचे 27 मे 1935 रोजी निधन झाले. रमाईच्या निधनानंतर बाबासाहेबांनी 1940 मध्ये 'थॉटस ऑन पाकिस्तान' हा मौलिक ग्रंथ लिहिला. हा ग्रंथ रमाईस अर्पण करतांना बाबासाहेब म्हणतात, 'हृदयाचा चांगुलपणा, मनाचा मोठेपणा, चारित्र्याचे शुद्धत्व आणि त्याकाळी कोणी मित्र नसलेल्या दिवसांत आमच्या वाट्याला आलेले दारिद्र्य आणि विवंचना मनोधैर्याने व तत्परतेने सहन करण्याची जिने तयारी दाखवली त्या रामूबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हा ग्रंथ तिला अर्पण करत आहे.' यावरून बाबासाहेबांच्या जीवनात रमाईचे योगदान अधोरेखित होते. माता रमाईच्या निधनानंतर तब्बल 13 वर्षे बाबासाहेब एकाकी सामाजिक लढा देत होते. स्वातंत्र्यप्राप्ती नंतर देशाच्या जडणघडणीत असलेले त्यांचे अत्युच्च योगदान पाहायला रमाई जीवंत नव्हत्या, याची खंत बाबासाहेबांना होती. आपल्या जीवनातील संघर्ष, प्रचंड कार्याचा व्याप सांभाळतांना बाबासाहेबांना डायबीटिज, न्युरायटीस, संधिवात, रक्तदाब सारख्या अनेक व्याधींना ग्रासले होते. त्यांचे स्वतःच्या स्वास्थ्याकडे दुर्लक्ष होत असे. आरोग्याची काळजी घेण्यासाठी बाबासाहेबांना लायक व्यक्तीची आवश्यकता होती. डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार नाईलाजाने दुसऱ्या विवाहाला बाबासाहेबांनी संमती दिली. डॉक्टर असलेल्या शारदा कबीरशी बाबासाहेबांचा दूसरा विवाह 1948 साली झाला. डॉ. शारदा कबीर उर्फ सविता आंबेडकर त्यांच्या कार्यकुशलतेमुळे आंबेडकरी जनता त्यांना सन्मानाने 'माईसाहेब' म्हणायचे.






श्रीराम बनसोड,
8208617748

माईसाहेब यांच्या योगदानामुळे बाबासाहेब देशाच्या संविधानाचे जनक बनले, दलितांच्या मुक्तीची धम्मक्रांतीची 1935 साली येवला येथे केलेली भीमप्रतिज्ञा पूर्ण करु शकले. जागतिक बौद्ध परिषदा, बुद्ध आणि त्यांचा धम्म, हिंदू कोड बील, रीडल्स इन हिंदुजम, क्रांती प्रतिक्रांती, बुद्ध की कार्ल मार्क्स यासारख्या कित्येक मौलिक ग्रंथांची निर्मिती बाबासाहेबांनी माईसाहेबांच्या काळात केली. 1950 मध्ये औरंगाबाद येथील मिलिंद महाविद्यालयाची स्थापना, 1953 मध्ये मुंबईतील सिद्धार्थ कॉलेज, 1956 मध्ये मुंबईचे सिद्धार्थ लॉ कॉलेज अशा शैक्षणिक संस्थांची उभारणी, भारतीय बौद्ध महासभेची स्थापना, यासारख्या क्रांतिकारक घटना व ऐतिहासिक कार्य करताना बाबासाहेबांना माईसाहेबांची मोलाची साथ लाभली. माईसाहेबांचा त्याग, सेवावृत्ती ही बाबासाहेबांना अनेक प्रसंगी बळ देणारी ठरली. 'आपल्या आयुष्यातील अखेरची आठ वर्षे ही 'शरू' हिची देण आहे' असे नमूद करायला बाबासाहेब विसरले नाही. 1990 साली डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना मिळालेला 'भारतरत्न' हा सन्मान माईसाहेबांनी बाबासाहेबांची पत्नी म्हणून स्वीकारला, यातच त्यांच्या योगदान अधोरेखित होते. बाबासाहेबांच्या महापरिनिर्वाणानंतर संशयातून त्यांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करून अपमानित केले गेले. त्यामुळे काही वर्षे त्यांना एकाकी जीवन जगावे लागले. परंतु दलित पॅंथर मधील त्यांची सक्रियता आंबेडकरी चळवळीत चैतन्य व ऊर्जा निर्माण करणारी ठरली. माईच्या बाबतीत असलेले सत्य व वस्तुस्थिती त्यांच्या आत्मचरित्रातून समाजासमोर यायला 1990 साल उजाडावे लागले. बाबासाहेबांच्या संघर्षमय व कडवट जीवन प्रवासात साथ देणाऱ्या रमाई व माईसाहेबांना त्रिवार वंदन! ■ ■

## खोटारडा

### अनंतायन



ॲड. अनंत खेळकर
मो. 9370061677

मोठ्या अपेक्षेने निवडून दिलेला लोक प्रतिनिधीही पूर्वीच्या नेत्यासारखाच निघाला. त्याने दिलेली आश्वासने अन् केलेल्या घोषणा या बोलाचाच भात अन् बोलाचीच कढी ठरला. जनतेचा अपेक्षाभंग झाला. एका चॅनलवर त्या नेत्याची मुलाखत सुरू होती. तो आपल्या त्या विकासकामांचा पाढा वाचत होता जी कामे त्याने कधी केलीच नाही. टिव्हीवर त्याची मुलाखत बघतांना एक व्यक्ती त्याच्या मित्राला म्हणाली, 'खरेच माणसाला त्यावेळी किती राग येतो, जेव्हा कुणी आपल्याशी धादांत खोटे बोलतो आणि आपल्याला काय खरे आहे ते माहीत असते.' त्यावर त्याचा मित्र म्हणाला, 'खोटे बोल पण रेटून बोल. ही पुढाऱ्यांची रीतच आहे. नेत्यांनी दिलेली जाहिरनाम्यातील आश्वासने ही सिगारेटच्या पाकीटावरील त्या वैधानिक ईशाऱ्यासारखी असतात, जी फक्त वाचायची असतात, पण पाळायची नसतात. हे काहीही असले तरी, नेहमी खोटारड्या व्यक्तींना सफाई द्यावी लागते. जो खरा असतो त्याला खुलासे करण्याची आवश्यकता वाटत नाही.' झूठ बेवजह दलील देता है सच खुद अपना वकील होता है. ■ ■

बहुजन सौरभ

## 21 व्या शतकात संविधानाचा आधार घेण्याऐवजी मुली आत्महत्या स्वीकारतात तेव्हा....

# तुम्हाला काय वाटते?

नुकतेच 16 मे 2025 ला उच्चभ्रू कुटुंबातील एका 23 वर्षीय महिलेने गळफास लावून आत्महत्या केली. आत्महत्या मागील कारण हुंडा प्रकरण व त्यातून होणारा मानसिक त्रास. हल्ली असे कारण फार कमी कानावर येतात. पण ते कमी कानावर आणले जातात की मुली स्वतः आंतरीतरित्या सहन करतात याही गोष्टीचा शोध घेणे अत्यंत गरजेचे आहे. पुण्यातील मुळशी तालुक्यातील भुकूम इथली वैष्णवी हगवणे माझी राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष राजेंद्र हगवणे यांची सून हिने गडफास लावून आत्महत्या केली ही वार्ता राज्यभर पसरली. मोठ्या कुटुंबातील स्त्रियांसोबत अत्याचार होतात का? असे अनेक प्रश्न या प्रकरणाने समोर आलीच.




**राजकारणाच्या बळावर काहीही–**

या प्रकरणात मोठ्या राजकारणी घराण्यातल्या गोष्टी अनेकदा चव्हाट्यावर येऊ नये यासाठी दबाव आणण्याचा प्रयत्न केला जातो हा ही प्रयत्न इथे केला गेला. कारण त्यांच्याजवळ बंदुकांचा उल्लेख सुद्धा आढळ्ला. मुळात या बंदुका त्यांच्याजवळ आल्या कुठून हा ही प्रश्न निर्माण होतो? देशाची राजकीय परिस्थिती खूप बदलत चाललेली आहे. राजकारण हे समाजकारण न होता हुकूमशाही होत आहे. राजकारणाच्या बळावर आपण काहीही करू शकतो अशी धारणा लोकांची झाली आहे म्हणून राजकीय लोकांसमोर झुकत माप घ्यावे लागते. हल्ली तर देशात गुंडे शाही जास्त सुरू आहे. कदाचित याच गुंडेशाहीलाव राजकीय वातावरणाला वैष्णवी बळी पडली असेल. पण तरीही आत्महत्या हा पर्याय नव्हता.

**अजूनही मुलीकडच्यांनी हुंडा द्यावा का? –**

अजूनही मुलीकडच्यांना हुंडा मागितला जातो त्याचे स्वरूप जरी बदलले असले तरी तोच प्रकार आहे. या प्रकरणात वैष्णवीच्या वडिलांनी पोलिसांना सांगितलेल्यानुसार हुंड्यासाठी तिचा मानसिक त्रास होत होता लग्नावेळी 51 तोडे सोने, एक फॉर्च्युनर कार व इतर महागड्या वस्तू त्यांनी मुलीला दिल्या. दर वेळेस माहेरी आल्यानंतर सासरी जातांना महागड्या वस्तू ती घेऊन जायची. जर खाली हाताने सासरी परतली तर सासरच्या लोकांकडून मानसिक त्रास दिला व्हायचा. म्हणजे मूळ मानसिकता बदललेलीच नाही आजही माहेरून जर एखादी सून महागड्या वस्तू आणत असेल तर घरात तिला जास्त मान व दुसरी सून जिच्या माहेरून अशा वस्तू येत नसतील तर तिचा मान कमी असतो हे तुमच्या माझ्या निदर्शनात नेहमीच येत असते. म्हणजे आमची मानसिकता आज कुठे आहे याचा विचार करण्याची गरज आहे.

**माहेरच्याची चूक नव्हती का? –**

मुळात वडिलांनी तिच्या लग्नात इतक्या मोठ्या वस्तू का द्याव्यात? दर वेळेस अशी मागणी होत असताना त्यांनी पोलिसांकडे तक्रार का केली नाही? मुलगी जर मानसिक त्रास होत आहे तर तिच्या बाजूने उभे न राहता समाजाचा विचार करणे किती योग्य आहे? आज संविधानिकरित्या आम्हाला अनेक हक्क प्राप्त झाले आहे. स्त्रियांना तर बरेच पण आजही जर आमची मूळ मानसिकता जात नसेल तर याला जबाबदार कोण असू शकतो याला जबाबदार आपण स्वतः असतो. त्यामुळे मुलीच्या घरच्यांनी सुद्धा या गोष्टीकडे पूर्वापार जर लक्ष दिले असते तर ही गोष्ट आज घडली नसती. दुसरी गोष्ट लग्नात हुंडा दिला म्हणजे मुलगी प्रॉपर्टीत हिस्सा मागणार नाही ही मानसिकता आहे. म्हणून मुलीला हुंडा देऊन दिला की संपले. हुंडा देण्यापेक्षा प्रॉपर्टी समान भागीदारी का नाही?

**आत्महत्या हा पर्याय ?? –**

खरेतर वैष्णवी सारख्या शिक्षित मुलीने असा निर्णय घेणे माझ्या दृष्टीने खूप चुकीचा आहे. मुळात अत्याचार सहन करणे हीच चुकीचे आहे. ते माहीत असून सुद्धा आपण त्याच चुका करत असू तर यात चूक कुणाचीच स्वतःचीच न. परक्या घरी जेव्हा लग्न करून आपण जातो तेव्हा आपल्यासाठी तिथल्या रिती, परंपरा वेगळ्या असतात पण माणूस म्हणून ओळखण्याची जर क्षमता आपल्यामध्ये नसेल तर त्या पदव्यांना, डिग्ऱ्यांना काय अर्थ आहे? की स्वतःच्या अन्यायविरुद्ध आवाज उठवता येत नाही. त्यामुळे आत्महत्या हा पर्याय जर वैष्णवीने न निवडता त्याच्यासाठी लढली असती तर ती खरी क्रांतिकारी झाली असती. आत्महत्या करून ती किती अशिक्षित होती याचा अंदाज आपण घेऊ शकतो. तुम्हाला काय वाटते नक्की सांगा? ■ ■



प्रीती तिरपुडे
मो. 7972119871

*विवाहातून रक्तसंबंध आणि त्यातून नाती निर्माण होतात. विवाह म्हणजे केवळ दोन व्यक्तींचे नाते संबंध नसून दोन कुटुंब आणि दोन कुटुंबामुळे या दोन कुटुंबाशी संबंधित इतर जेव्हढी कुटुंब असतील त्यांच्याशी पण नाते जोडणे होय. याचा अर्थ विवाह म्हणजे नात्याचे जाळे निर्माण करणे होय. या जाळ्यातील प्रत्येक कुटुंब आणि नाते एकमेकांची काळजी वाहत असतात. एकमेकांच्या दुःखात आणि सुखाचे प्रसंगी धाऊन येत असतात.*

# विवाह कशासाठी ? नात्यासाठी की प्रपंचासाठी ?

विवाहाच्या जाळ्यातील प्रत्येक जण आपल्याशी कुणाचे काय नाते आहे? हे माहित असते. त्या नात्याची ओळख आणि जाणीव ठेवायची असते. एकमेकांशी संबंध ठेवायचे असते. एकमेकास सहकार्य करायचे असते. यासाठीच ही विवाहाचे जाळे असते. विवाह म्हणजे नात्यांचे बंधन, दुष्ट बंधन नसून पवित्र बंधन होय. नात्यांचा उपयोग एकमेकांना हात देऊन संकटातून बाहेर काढण्यासाठी असतो. पत्नीकडच्या साऱ्या नात्यांची कुटुंबे आणि पलिकडच्या साऱ्या नात्यांची कुटुंबे, असेच आई, भाऊ, बहीण, आजोबा, आजी, मामा, मामी, सारे मेहुणे, मेहुणी या सर्व नात्यांची कुटुंबे आणि त्या कुटुंबातील प्रत्येक माणसे यांचे एकमेकांशी कोणते ना कोणते नाते निर्माण होते, ते नाते जपायचे असते. यासाठीच तर विवाह हा एक संस्कार सोहळा असतो, म्हणजेच साऱ्याच नातेवाईकांचा तो एक प्रकारचा मेळावाच असतो. गेट टुगेदरच होय. यात हल्ली मित्रांच्या नात्यांचा पण समावेश होत आहे. नातेवाईक आणि सर्व जाती धर्माचे संबंधित लोक एकत्र येणे हे अधिकच चांगले होय. कारण सर्व नातेवाईक तर एकत्र येतातच. पण त्याच बरोबर आपल्या व्यवसायातील सहकारी आणि आपल्या जीवनातील मित्र एकत्र येणे म्हणजे एक प्रकारची सामाजिक समरसता, एकता निर्माण करणे होय. सामाजिक सलोखा प्रस्थापित करणे होय.

विवाहाचा उद्देश जर वरीलप्रमाणे असेल तर, तो उद्देश हल्ली साध्य होताना दिसत नाही. सध्याची सामाजिक आर्थिक परिस्थितीमुळे एकत्रित कुटुंबे नाहीशी झाली. कारण नोकरी, व्यवसायसाठी घरातील कुटुंबातील सारे भाऊ, आई वडील एकत्र रहात नाहीत, वेगवेगळ्या लांब अंतरावर रहावे लागते, शेती व्यवसाय डबघाईला आला, म्हणून खेडेगावातील लोक विविध शहरात स्थलांतरित झाले. वर्षातून एकदा सुद्धा भेटत नाहीत. म्हणून नात्याचे जाळे तुटताना दिसते आहे. परिणामी आई वडील पण मुलांना नकोशी झाली आहेत. कारण एकत्र न राहण्यामुळे आणि शहरातील छोटीशी घरे, अपुरी जागा, महागाई हे पण नाते दूर जाण्याची कारणे आहेत. म्हणून हल्ली माणसाचे विश्व फारच संकुचित झाले आहे, मी बायको, दोन मुले, एक घर, मोटर सायकल आणि आपला धंदा नोकरी यातच विवाहबद्ध झालेली नवीन जोडपी अडकली आहेत कोशातील किड्यांप्रमाणे. अर्थात दोष त्यांचा किंवा कुणाचाही नाही, तर दोष किंवा याचे कारण आहे, भांडवली अर्थव्यवस्था. शोषण करणारी, भरमसाठ नफा कमावणारी, महागाई बेकारी वाढवणारी अर्थव्यवस्था. ही विषमतावादी अर्थव्यवस्था निर्माण करणारे सरकार आणि निवडून जाणारे राजकर्ते, कार्यकर्ते, नियोजन करते.

विवाह हा प्रपंच करण्यासाठी करायचा असतो, म्हणजेच बायको, मुले, घर, नोकरी व्यवसाय यासाठी. म्हण आहे 'प्रपंच करावा नेटका, कधी नसावा फटका'. याचा अर्थ योग्य नियोजन करणे, अंथरूण पाहून पाय पसरणे, सतत प्रयत्नशील असणे, यशस्वी वाटचाल करणे वगैरे. हे सारे उपदेशपूरते ठीक आहे, वस्तुस्थिती मात्र वेगळीच असते, कारण कुणी गरीब, तर कुणी मध्यम, तर कुणी श्रीमंत हे वर्ग आपोआपच निर्माण होत नसतात. दैव किंवा देव यास कारणीभूत नसतात, तर अधिक श्रीमंती याचा अर्थ अधिक गरीबी, म्हणजेच अधिक पिळवणूक आणि शोषण यामुळे ही वर्गीय आर्थिक समाजरचना निर्माण होत असते. म्हणून किती मुलांना जन्म द्यावा? घर कसे असावे? आपले आरोग्य कसे असावे? मुलांचे शिक्षण कसे असावे? हे विवाह वरुन ठरत नाही, की प्रपंचावरून. हे सारे ठरते आर्थिक विषमता, वर्गीय अंतर किती असावे? हे सरकार ठरवीत असते. म्हणून प्रपंच नेटका किंवा फटका करणे हे त्यांच्याच हातात असते. विवाह का करायचा? तर नाते संबंध घट्ट करणेसाठी, हे नाते टिकण्यासाठी मजबूत करणेसाठी नात्यात प्रेम, आपुलकी, जिव्हाळा, काळजी हवी ती वर्तमान व्यवस्थेत आणि परिस्थितीत निर्माण होत नाही, म्हणून ती दिसत नाही. धार्मिक शिक्षण तर असे आहे की, प्रपंच हा संसार खोटा आहे, भासमान आहे, यात काही राम नाही.




दत्ता तुमवाड
मो. 9420912209

ही नाती सारी खोटी आहेत, कमाई कितीही केली तरी शेवटी मेल्यानंतर सोबत येणार नाही. मोक्षप्राप्ती हेच जीवनाचे ध्येय्य असले पाहिजे. असे नेहमीच महाराज कीर्तनातून पोथ्यापुराणातून सांगत असतात, सारेच जण माना डुलवतात, तरी प्रपंच करायचे कुणी सोडत नाहीत, याचा अर्थ धार्मिक शिक्षण हे केवळ करमणूकचे साधन बनले आहे, कारण हे शिक्षणच मुळी चुकीचे आणि निराधार आहे. प्रपंच कसा महत्वाचा आहे, यातून नाते कसे निर्माण होतात, परस्पर सहकार्य कसे करायचे? नाती किती महत्त्वाची आहेत आणि ती कशी टिकवली पाहिजेत. नाती संबंध कशी असावीत? काही जोडावेत? ते कसे टिकवावे? हे शिक्षण न देता, कुणाची आई आणि कुणाचा बाप, कोण कुणाचा भाऊ हे सारे स्वार्थी नाते आहेत आणि हा प्रपंच म्हणजे मायाजाल आहे, खोटा आहे. खरे काय तर ते म्हणजे फक्त ईश्वर. म्हणून संसार सोडा अन् ईश्वराच्या नादी लागा. म्हणजे त्यात तलिन व्हा. असे धर्मगुरू सांगतात आणि भक्तांच्या कमाईवर हे जगतात. तरी विवाहप्रसंगी त्यांचे आधी दर्शन करूनच विवाह होतात, किती हा विरोधाभास? खरे तर विवाह म्हणजे नात्यांचे बंधन आणि प्रपंचाची जबाबदारी होय, हे बंधन निभावले पाहिजे आणि संसाराचे ओझे पेलले पाहिजे. हा विवाहाचा खरा उद्देश आहे. नाती जोडण्यासाठी विवाह आणि ती मजबूत करण्यासाठी प्रपंच संसार आहे. असा सामाजिक आशय ज्यांना समजला ते कसेतरी सुखी आनंदी दिसतात आणि धार्मिक आशय ज्यांना समजला ते संसारात दुःखी आणि परेशान आहेत. हेच वास्तव आहे. ■ ■

**'जयपूर लिट- फेस्ट' (जयपूर साहित्य मेळा) 2006 पासून सुरु झालेला हा महोत्सव आज देशातील तसेच जगभरातील वाचक, लेखक आणि विचारवंतांचे आकर्षण झाला आहे. त्याच बरोबर युवक, शालेय विद्यार्थी, शिक्षक यांची होणारी गर्दी, साहित्य विषयक दर्दी आणखी सकस असे ऐकण्यास, वाचण्यास उत्सुक आहेत याची साक्ष देते.**

# रंगकर्मीसाठी गाईड द व्ह्यूफायंडर

अलीकडेच हा फेस्ट संपन्न झाला. त्यानिमित्ताने विचारवंत, लेखकांनी व्यक्त केलेले विचार, त्यांचे परखड भाष्य अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि लोकशाही विषयक मूल्ये मानणाऱ्या सर्व घटकांसाठी आशावादी असणारी आहेत. या फेस्ट मध्ये कवि जावेद अख्तर यांचे 'हुकूमशाही व्यवस्थेत कवि निर्माण होत नाही कारण कविला प्रेमाचे वातावरण हवे असते' किंवा अभिनेता अमोल पालेकर यांचे 'सरकार विरोधात बोलणारे देशद्रोही' हे निरीक्षण, भाष्य एकाच दिशेने अंगुली निर्देश करणारी होती. यावर कुणीही सहमत होईल.

अमोल पालेकर यांची 'द व्ह्यूफायंडर' या आत्मचरित्रासंदर्भात या लिट फेस्ट मध्ये मुलाखत घेण्यात आली. याचा मराठी अनुवाद 'एवज एक स्मृतीबंध' हा रंगकर्मीसाठी मार्गदर्शक असा दस्तऐवज आहे. या जवळपास तीनशे पानी पुस्तकातील 'विरोध करण्यावर ज्यांचा विश्वास आहे त्या सगळ्यांना' हे अर्पणाचे वाक्य लोकशाही मूल्ये मानणाऱ्या सर्वांसाठी प्रेरक असे आहे. चित्रपटातील अभिनेता केवळ अभिनय करण्यापुरता मर्यादित न राहता सभोवताली घडणाऱ्या घटनांप्रती सजग असावा. लेखक, दिग्दर्शकाने सूक्ष्म तपशिलासह सादरीकरण करावे. सोबतच्या सह कलावांताबाबत संवेदनशीलता असावी. वैचारिक आणि सामाजिक बांधिलकी कलावंतांनी जपली पाहिजे ती जपताना किंमत मोजावी लागली तरी तयारी असावी. असे प्रसंग यात वाचावयास मिळतात.

अभिनेता अमोल पालेकर आठवतात ते रजनीगंधा, चितचोर, गोलमाल, छोटीसी बात यासह अश्याच पठडीतील चित्रपटातील सहज सुंदर अभिनयासाठी. मध्यमवर्गीय पार्श्वभूमीचा हिरो प्रेक्षकांना भावला. परंतु, अमोल पालेकर यांचे नाट्य क्षेत्रातील योगदान सामान्य माणसांना फारसे परिचित नाही. या पुस्तकातून त्याची ओळख होते. नाट्यनिर्मितीसाठी अभिव्यक्ती स्वातंत्र्य किती महत्त्वाचे आहे आणि त्यासाठी त्यांनी कसा संघर्ष केला हे वाचून त्यांची बांधिलकी आणि परिश्रम लक्षात येतात. पुस्तकात त्यांनी समकालीन घटनांवर जसे बिल्कीस बानो प्रकरण, खैरलांजी, मणिपूर दंगल आणि इतरही संदर्भात व्यक्त केलेली मत विवेकी लोकांना जागृत करणारी आहेत.

'भासवला गेलेला न्याय खरा नसतोच' हे पुस्तकातील वाक्य वर्तमान स्थितीवर मार्मिक भाष्य करणारे आहे. अमरीश पुरी, उत्पल दत्त, बासू चटर्जी, ऋषिकेश मुखर्जी, गिरीश कर्नाड, बादल सिरकार, सत्यदेव दुबे अश्या कलावंत आणि नाट्यकर्मि बाबत अनेक तपशील यात वाचावयास मिळतात. त्यांची बांधिलकी आणि सहकाऱ्या बाबतची सहृदयता वाचून एक वेगळा पैलू लक्षात येतो. उत्पल दत्त सारखा चरित्र अभिनेता आपल्या मुख्य धारेतील चित्रपटातून प्राप्त रक्कम आपल्या आवडत्या नाट्य क्षेत्रासाठी वापरत असे.






अनिरुद्ध कांबळे
मो.9922959770

तर गंभीर आजारी असूनही अमरीश पुरी यांनी नाट्यात केलेली भूमिका त्यांचे नाट्य प्रेम आणि बांधिलकीची ओळख करून देते. आपण चित्रपटात बघितलेले नायक आणि वास्तविकता जेव्हा कळते तेव्हा अश्या बांधिलकीला कोणताही दर्दी सलामच करेल. हे लेखन या पुस्तकाचे समीक्षण नाही. वाचक आणि कलेच्या क्षेत्रात रुची असल्याने या क्षेत्रात रुची ठेवणाऱ्या, येऊ इच्छिणाऱ्या नवोदितांसाठी 'व्ह्यू फाइंडर' (मराठी-ऐवज एक स्मृतीबंध) मार्गदर्शक आहे म्हणून हा प्रपंच. ■ ■

# दान म्हणजे काय ? आणि कोणाला करावे ?

भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म ग्रंथानुसार - स्वार्थाची किंवा परतफेडची अपेक्षा न करता दुसऱ्यांच्या भल्यासाठी स्वतःची मालमत्ता 'रक्त आणि देह' अर्पण करणे इतकेच नव्हे तर प्राणत्याग करणे म्हणजे दान होय.

यात कोणताही भिक्षू स्वतःची मालमत्ता रक्त आणि देह अर्पण करू शकत नाही. म्हणजे हा उपदेश फक्त आणि फक्त सामान्य माणसाला म्हणजेच बौद्ध धर्मातील उपासकाला लागू होतो. असेच म्हणावे लागेल आणि हेच ब्राम्हण भट - पुरोहितांना अपेक्षित होते.

**दान या शब्दाचा अर्थच खरा न कळल्याने आपणा सर्वांची गोंधळाची अवस्था झाली आहे. ज्याप्रमाणे हिंदू धर्मातील ब्राम्हणांनी 'दान दक्षिणा' या शब्दालाच अन्यन महत्व दिलेले आहे.**

आता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दानाची खरी व्याख्या काय केली आहे ते पाहू.

दान म्हणजे कोणत्याही प्रकारची अपेक्षा न करता दुसऱ्यांसाठी तन-मन-धन अर्पण करणे.

संदर्भ - खंड 18.भाग - 3.पृष्ठ. क्र. 369. पैरा - 3. यात प्रज्ञाचे महत्त्व सांगितलेले आहे. पुढे ते म्हणतात - म्हणूनच पाली वाङ्मयात म्हटले आहे की, गौतम बुद्धांनी वरीलप्रमाणे 'दान पारमिता' जरी शिकवली असली तरी दान हे सतपात्री असल्याबाबत त्यांचा कटाक्ष होताच. दान देण्यासाठी दाता जरी प्रवृत्त झाला तरी त्यामुळे ज्याला दान दिले जाते, त्याला मात्र त्याने कमीपणा येता कामा नये. पददलितांना एक दिवस स्वतःच्या पायावर उभे राहण्यास सामर्थ्य निर्माण करणारी शक्ती तिला आपण मदत म्हणतो तेच खरे दान. संदर्भ - उपरोक्त.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि दान बद्दल जे विचार व्यक्त केले आहे. त्यानुसार समाजातील दान देणारे पद दलितांना म्हणजे आमच्या जे आपल्या समाजात गरीब - दरिद्री आणि शोषितांचे जीवन जगत आहेत. त्यांना आपल्या पायावर उभे राहण्यास मदत करतात काय? या प्रश्नाचे कोडेच असून निश्चितच नाही असे म्हणता येईल. परंतु बौद्ध भिक्षुनी ब्राम्हण धर्मातीलही दानाच्या नावावर ही वृत्ती अजूनही कायम ठेवली आहे. असे म्हटले तर वावगे ठरू नये. पुन्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर दान या शब्दाबद्दल सकारात्मक व्याख्या करून त्यांच्या लिखित खंडात म्हणतात - संकटग्रस्तांना वाचविण्यासाठी पराकाष्ठा करणे याला 'दान पारमिता' म्हणतात.

संदर्भ - खंड - 18 भाग - 3.पृष्ठ. क्र. 441. शेवटचा पैरा. पहिली ओळ. आता विचार करण्यासारखा प्रश्न आहे की, आपल्या समाजातील भिक्खु संकटग्रस्तात अडकलेले आहेत काय? बिलकुलच नाही. परंतु दानाच्या नावावर 'विपश्यना सेंटर' करोडो रुपये खर्च करून उभारल्या जात आहेत आणि आपले अंधभक्त उपासक लाखो रुपये दान करून डोळे मिटून मठात - पगोड्यात बसत आहेत. ■ ■









हंसराज कांबळे
मो. 8626021520

# डॉ. आंबेडकर यांच्यानंतर आता महात्मा गांधींनी संघ शाखेला भेट दिल्याचा दावा



**नागपूर :** भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार मानले जाणारे बाबासाहेब आंबेडकरही संघाच्या शाखेत आले होते, असा दावा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या माध्यम शाखेने केला. त्यानंतर आता महात्मा गांधी यांनी दिल्लीतील संघ शाखा आणि संघाच्या एका शिबीरला भेट दिल्याचे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अखिल भारतीय प्रचार प्रमुख सुनील आंबेकर यांनी दावा केला आहे.

संघाच्या माध्यम शाखेने 2 जानेवारी 1940 रोजी आंबेडकर यांनी सातारा जिल्ह्यातील कराड येथील एका शाखेला भेट तर दिलीच, शिवाय तेथे उपस्थित स्वयंसेवकांनाही संबोधित केले, असा दावा केला होता. त्यावरून वाद निर्माण झाला होता. आता आंबेकर यांनी, 1937 मध्ये राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शिबिर (शिबिर) भेटीदरम्यान गांधीजींनी हेडगेवार यांच्याशी संवाद साधला होता. तसेच महात्मा गांधींनी 1947 मध्ये दिल्लीतील वाल्मिकी मंदिरातील एक 'शाखा'लाही भेट दिली होती, असा दावा केला आहे.

महात्मा गांधी आणि डॉ. केशव हेडगेवार यांची तुलनेची गरज नाही. या दोन्ही महापुरुषांनी राष्ट्र उभारणीचे कार्य केले, असे प्रतिपादन आंबेकर यांनी केले. ते डॉ. माधव पात्रिकर लिखित डॉ. हेडगेवार आणि महात्मा गांधी एक दर्शन लेखक या पुस्तक प्रकाशन सोहळ्याच्या निमित्ताने बोलत होते.

उत्तर अंबाझरी मार्गावरील सेवासदन परिसरात या कार्यक्रमाचे आयोजन शनिवारी करण्यात आले. यावेळी गांधी-विनोबा विचारांचे अभ्यासक डॉ. अपरुप अडावतकर, प्रकाशक चंद्रकांत लाखे लाखे प्रकाशन उपस्थित होते.

आंबेकर म्हणाले, स्वातंत्र्य प्राप्तिसाठी झालेला प्रत्येक प्रयत्न श्रद्धेय आहे. महात्मा गांधी यांनी अहिंसेच्या मार्गाने समाजाला जोडण्याचा प्रयत्न केला. नेताजी सुभाष चंद्र बोस यांनी आझाद हिंद सेनेच्या माध्यमातून देश स्वातंत्र्यासाठी कार्य केले. श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी हिंदू महासभेच्या माध्यमातून कार्य केले.

महात्मा गांधी आणि डॉ. हेडगेवार यांनी रामराज्यांची कल्पना मांडली. राष्ट्र म्हणून एकसंघ राहीला पाहिजे यासाठी दोघांचेही प्रयत्न होते. त्यामुळे गांधींनी भारताच्या फाळणीला विरोध केला होता. मात्र, भारताची फाळणी हिंदुत्व कमकुवत होते म्हणून झाले की, नेतृत्व कमकुवत होते म्हणून झाले हा चर्चेचा विषय आहे आणि राहील, असे ते म्हणाले.

महात्मा गांधी आणि डॉ. केशव हेडगेवार यांच्यात 20 वर्षांचे म्हणजे एका पिढीचे अंतर होते. तत्कालिन परिस्थितीनुसार महापुरुष त्यांचे कार्य करीत असतात. आजच्या परिस्थितीनुसार त्यांच्या कार्याचे आकलन करणे त्यांच्या अन्याय ठरले. त्यामुळे इतिहासात काय झाले ते न बघता वर्तमान आणि भविष्याचा वेध घेतला पाहिजे. समाजमाध्यमावर महात्मा गांधींबद्दल चुकीची माहिती प्रसुत केली जाते आहे. तीच खरी देखील मानली जात आहे. हे टाळून मूळ लेखन वाचून महात्मा गांधी यांना समजून घ्यावे, असे आवाहन अपरुप अडावतकर यांनी आवाहन केले.

# नागपुरात ई.डी.चे छापे




**नागपूर :** 26 मे रोजी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचे नागपुरात दोन कार्यक्रम आहेत. त्यासाठी 25 तारखेला रात्री अमित शहा शहरात दाखल होणार आहेत. त्यांच्या दौऱ्याच्या तयारीत पोलीस आणि प्रशासकीय यंत्रणा व्यस्त असताना शुक्रवारी 23 मे रोजी अंमलबजावणी संचालनालयाच्या (ई.डी.) अधिकाऱ्यांनी नागपुरातील हवाला व्यापारी शैलेष लखोटिया आणि सराफा व्यापारी पुरुषोत्तम कावळे यांचे घर आणि व्यावसायिक ठिकाणावरछापे घातले. ई.डी. च्या रायपूर कार्यालयातील अधिकाऱ्यांनी नागपूरच्या अधिकाऱ्यांच्या मदतीने ही कारवाई केली.

ई.डीचे अधिकारी शुक्रवारी सकाळी लखोटिया और कावळे यांच्या व्यासायिक ठिकाणी पोहचले व त्यांनी तपासणी सुरू केली. पुरुषोत्तम कावळे यांचे इतवारी येथे 'सागर ज्वेलर्स' हे दुकान आहे तर गांधीसागर तलावाच्या जवळ त्याचा फ्लॅट आहे. या दोन्ही ठिकाणी एकाच वेळी ईडीचे अधिकारी धडकले. कावळे यांना चौकशीसाठी सोबत नेण्यात आले. दरम्यान कावळे यांच्यावर यापूर्वीही डीआरआईच्या पथकाने कारवाई केली होती.

सोने की तस्करी प्रकरणात त्यांना अटकही झाली होती. त्याच प्रमाणे हवाला व्यापारी शैलेष लखोटिया यांच्या वर्धमान नगरमधील घरी आणि कार्यालयावरही ईडीने छापे घातले. लखोटिया हे हवाला सोबत ऑनलाइन सट्टा व्यवसायाशी संबंधित असल्याची शंका आहे.




## सोमलवाडा बुद्ध विहार

अध्यक्ष : सारंग कांबळे 9325176225, सचिव : सचिन गोले 8657774464, विहाराच्या वर अभ्यासिकेसाठी बांधकाम सुरू आहे. पोर्णिमा आणि प्रासंगिक कार्यक्रम आयोजित करण्यात येतात रोज सायंकाळी वंदना घेण्यात येते.

संवाद मित्र, श्रीराम बनसोड
मो. 918208617748

## महत्वाचे

### श्रामनेर दीक्षांत बौद्ध संस्कृती संस्कार प्रशिक्षण शिबीर



**नागपूर :** भारतीय सतधम्म बुद्ध विहार लष्करीबा येथे श्रामनेर दीक्षा विधी भदंत नागवंश यांच्या हस्ते पार पडली. भदंत कुमार काश्यप, भदंत महानाम, भदंत भदंत लामा , भदंत धम्मदिप, 'भदंत मिलिंद' आणि भिख्खू संघ उपस्थितीत होते. श्रामनेर शिबिराचे उद्घाटन नेत्र तज्ञ डॉ. अजय भालाधरे आणि डॉ. अंजली भालाधरे यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाचे अध्यक्ष सखाराम मंडपे गुरुजी तर प्रमूख पाहुणे नीळकंठ बहादुरे, भगवान निमगडे, मनिष भगत, किशोर चौधरी, गुणवंत सोनटक्के, सिध्दार्थ फोफरे यांनी मनोगत व्यक्त केले. सतधम्म विहार समितीचे अध्यक्ष डी.एम. बेलेकर, सचिव राजकुमार मेश्राम, रेखा वानखेडे उपस्थितीत होते. शनिवार दि. 31 मे 2025 ला शिबीराचा समारोप होणार आहे. शिबिरात 50 श्रामनेर आणि 12 अनागारिक आर्याजी या भदंत 'नागवंश' यांच्या कडून प्रशिक्षन घेत आहे. संचालन ललितकुमार कांबळे यांनी तर आभार वर्षा धारगावे यांनी मानले.

### बाजार समितीतूनच बोगस खत विक्रीचा कट



**भंडारा :** खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर कृषी विभाग सज्ज झाला आहे. बनावट बियाणे, अवैध आणि विनापरवाना खते, जादा दराने खते, बोगस बियाणांची विक्री करणाऱ्यांवर थेट कारवाई केली जात आहे. दरम्यान बोगस खतांची विक्री करून शेतकऱ्यांची फसवणूक करण्याचा एका बाजार समितीचा कट कृषी विभागाच्या गुणवत्ता नियंत्रण अधिकाऱ्यांनी भंडाऱ्यात उधळून लावला. या प्रकारानंतर एकच खळबळ उडाली आहे. शेतकऱ्यांची बाजार समिती म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भंडाऱ्याच्या लाखनी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कृषी केंद्रातून बोगस खतांची विक्री करण्यात येणार होती. मात्र, त्यापूर्वीच कृषी विभागाच्या गुणवत्ता नियंत्रण पथक आणि मोहीम अधिकाऱ्यांच्या पथकाने धाड टाकून तब्बल 129 मेट्रिक टन (1 लाख 29 हजार 250 किलो) ब्रह्मास्त्र भू सुधारक नावाचे खते ताब्यात घेतले.

### शालार्थ आयडी घोटाळ्यात भाजपच्या माजी खासदाराचा भाऊ फरार



**नागपूर :** शालार्थ आयडी घोटाळ्यात निवृत्त विभागीय शिक्षण उपसंचालक अनिल पारधी, नागपूर विभागीय शिक्षण मंडळाचे अध्यक्ष व तत्कालीन शिक्षण उपसंचालक चिंतामण वंजारी, छत्रपती संभाजीनगर येथील विभागीय शिक्षण मंडळाच्या सचिव व नागपूरच्या तत्कालीन विभागीय शिक्षण उपसंचालक वैशाली जामदार यांना बेड्या ठोकल्यानंतर आता विशेष तपास पथकाच्या (एसआयटी) रडारवर तत्कालीन विभागीय शिक्षण उपसंचालक सतीश मेंढे असल्याची विश्वसनीय माहिती आहे. सतीश मेंढे हे भाजपाचे भंडारा लोकसभेचे माजी खासदार सुनील मेंढे यांचे सख्खे बंधू आहेत. त्यामुळे या प्रकरणाला नवीन वळण मिळण्याची शक्यता आहे. विशेष म्हणजे खासदार मेंढे यांच्या अनेक शाळा आहेत. वैशाली जामदार यांच्या अटकेनंतर पीडित शिक्षकांना हिंमत मिळाली असून वर्धेतील एक शिक्षिका तक्रार देण्यासाठी नागपुरात येणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. यानंतर या प्रकरणात आणखी धक्कादायक खुलासे होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे

### राजकीय आशीर्वादाने चंद्रपूर जिल्ह्यात अवैध धंदे फोफावले




**चंद्रपूर :** जिल्ह्यात अवैध आणि बनावट दारू, तंबाखू, गुटखा, गांजासह इतर अमली पदार्थ तसेच कोळसा व वाळूची तस्करी, ऑनलाइन-ऑफलाइन सट्टा, जुगार, यांसह सर्वच प्रकारचे अवैध व्यवसाय राजकीय आशीर्वादाने व अधिकाऱ्यांच्या मर्जीने फोफावले आहेत. सर्वपक्षीय नेते, पदाधिकारी व कार्यकर्ते यात गुंतले असल्याने अधिकारीही कारवाई करण्यास धजावत नाहीत. यामुळे अतिशय सुरळीतपणे हे अवैध धंदे जोरात सुरू आहेत. औद्योगिक नगरी, अशी ओळख असलेल्या या जिल्ह्याला विपुल खनिज आणि वनसंपत्तीचे वरदान आहे. मात्र, राजकीय आशीर्वाद असलेल्या तस्करांकडून या खनिज संपत्तीची अक्षरशः लुट सुरू आहे. अवैध व्यवसाय व तस्करीत सर्वच पक्षाचे नेते आणि दुसऱ्या फळीतील पदाधिकारी व कार्यकर्ते सक्रिय आहेत

# मुख्याध्यापकांना आता विद्यार्थ्यांच्या गणवेशाची चिंता

**अमरावती :** पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना शाळेच्या पहिल्या दिवशी गणवेश देण्यात येतो. आतापर्यंत तो कधीही वेळेत मिळाला नाही. मात्र, गणवेश निधी देताना मागील वर्षीच्या 'यूडायस'च्या आधारे निधी मिळतो. नवीन वर्षात प्रवेश संख्या वाढली तर प्रवेशित विद्यार्थ्यांना गणवेश कोणत्या निधीतून द्यायचा, असा प्रश्न मुख्याध्यापकांना पडला आहे. या वर्षाला गणवेश खरेदीचा अधिकार शाळा व्यवस्थापन समितीला देण्यात आले आहे. आता प्रशासनाला शाळेच्या पहिल्याच दिवशी दोन शालेय गणवेश, बुट, मोजे देण्याचा आग्रह सुरु झाला आहे.समग्र शिक्षा अभियानांतर्गत राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील इयत्ता पहिली ते आठवीच्या सर्व विद्यार्थ्यांना प्रती विद्यार्थी दोन गणवेश मोफत उपलब्ध करून दिले जातात. त्यासाठी शासनाकडून शाळा व्यवस्थापन समितीला प्रती विद्यार्थी, प्रती गणवेश 300 रुपये प्रमाणे निधी देतात. त्यातही आता एक गणवेश स्काऊटगाईड पद्धतीचा देण्याची अट शासनाची आहे. त्यामुळे या गणवेशासाठी कापड व शिवण्यासाठी अधिक पैसे लागणार आहे. वाढत्या महागाईच्या काळात 300 रुपयांत गणवेशाचे कापड व शिवण्याचा खर्च भागविणे शक्य होत नसल्याची भावना मुख्याध्यापक बोलून दाखवत आहे.



महत्वाचे म्हणजे मागील वर्षीच्या 'युडायस'वर असलेल्या पटसंख्येच्या आधारे गणवेश निधी दिला जाते. नवीन वर्षात पटसंख्या वाढली तर निधी अपुरा पडतो. मात्र सर्व विद्यार्थ्यांना गणवेश देणे आवश्यक अनेकदा मुख्याध्यापक व शिक्षकांना स्वतःच्या जवळून पैसा खर्च करावा लागतो. यामुळे शैक्षणिक क्षेत्रात रोष आहे. चालू शैक्षणिक सत्राच्या पटसंख्येवर आधारीत शाळांना गणवेश निधी मिळण्यात यावा, अशी मागणी आहे. पहिली व आठवीच्या विद्यार्थ्यांच्या गणवेशासाठी सारखाच निधी मिळतो. त्यातही सातवी, आठवीच्या विद्यार्थ्यांना मुलांना फुलपँट व मुलींना सलवार कमीज असा गणवेश द्यावा लागतो. त्यासाठी कापड व शिवणकाम खर्चही जास्त येतो.

### अनुदानात वाढ होणे गरजेचे

वाढत्या महागाईमुळे कापडाचे भाव व शिवण्याचा दर लक्षात घेता 300 रुपयात चांगला गणवेश तयार होत नाही, त्यातही स्काऊटगाईडचा गणवेश, 7वी, 8 वी च्या मुलांना फुलपँट, मुलींना सलवार कमीज यामुळे खर्च अधिक वाढतो त्यामुळे गणवेशाच्या निधीत वाढ होणे गरजेचे आहे. शासनाने किमान 500 रुपये प्रती गणवेश प्रमाणे गणवेश निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे राज्य प्रसिध्दी प्रमुख राजेश सावरकर यांनी केली आहे.

# विकलांग केंद्राच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त दिव्यंगता मुक्त अभियान

## ऑइल अँड नॅचरल गॅस कंपनीच्या सीएसआर निधी अंतर्गत नागपुरात मोफत दिव्यांग शिबिराचे आयोजन 20 जून रोजी




**नागपूर :** वीरशैव सेवा समाज नागपूर आणि भारत विकास परिषदेच्या संयुक्त विद्यमाने दिव्यांग केंद्र पुणे आयोजित तीनशे दिव्यांगांना आधुनिक कृत्रिम मॉड्युलर पाय आणि हात, पोलिओ कॅलिपर निःशुल्क बसविण्यासाठी मोजमाप शिबिराचे आयोजन घेण्यात येत आहे. विश्वस्त व दिव्यांग केंद्र प्रमुख विनय खटावकर पुणे यांनी शिबिराच्या संपूर्ण नियोजनाची आणि आधुनिक माड्युलर पाया विषयी ही माहिती दिली. माहिती देते वेळेस आधुनिक कृत्रिम मॉड्युलर पायाची कमर्शियल किंमत रुपये पन्नास हजारापेक्षा जास्त व कृत्रिम हाताची कमर्शियल किंमत 25 हजारा पर्यंत आहे असे कृत्रिम अवयव ह्या शिबिरात तीनशे दिव्यांगाना मोफत देणार असल्याची माहिती दिली.

नवभारत विकास फाउंडेशन भारत विकास परिषद विकलांग पुनर्वसन केंद्र पुणे च्यावतीने पत्रकार परिषद घेण्यात आली.

नागपूर व जवळपासच्या सर्व जिल्ह्यातील दिव्यांगांना विनंती केली जात आहे की शिबिरासाठी पूर्व नोंदणी करावी अन्यथा शिबिरात प्रवेश मिळणार नाही जयंत 9175558356 आणि कुलकर्णी -8766453192 यांच्या मोबाईल क्रमांकावर आपल्या नावाची नोंद करावी. असे पत्रकार परिषदेत कळविले आहे. या पत्रकार परिषदेला वीरशैव सेवा समाज नागपूरचे विश्वस्त प्रकाश मोतेवार, चंद्रशेखर अनवाणे, अमोल कापसे, राजेश जयकुमार, जयंत शेडगे तसेच अध्यक्ष प्रफुल्ल केळकर आणि संजय गुळकरी यांची उपस्थिती होती.

# शासन धोरणावर बोलले तर कारवाई करण्यात येईल ...



**वर्धा :** शासन विविध निर्णय घेत असते. तसेच शासनाकडून धोरणात्मक भूमिका पण घेण्यात येत असते. शिवाय वरिष्ठ अधिकारी पण प्रशासकीय निर्णय घेण्याची भूमिका बजावतात. राज्य कारभार चालविण्यासाठी ही कायदेशीर अंमलबजावणी असते. पण त्यावर टीका करण्याचा अधिकार पण राखून ठेवण्यात आला आहे. ती सार्वजनिक प्रतिक्रिया असते. मात्र शासकीय अधिकारी व कर्मचारीच जर टीका करत असतील तर ? महाराष्ट्र नागरी सेवा ( वर्तनुक ) 1979 या तरतुदीशी विसंगत आहे. शासकीय कामकाजात सचोटी, कर्तव्य परायणता आदी राखण्याबाबत असलेल्या त्यांच्या नमूद कर्तव्यात बाधा आणणारी ठरते. म्हणून ही बाब अत्यंत गंभीर स्वरुपाची ठरते. म्हणून संचालनालयच्या आस्थापनवरील सर्व कर्मचारी व अधिकारी यांना निर्देश आहेत. त्यांनी शासनाच्या धोरनात्मक निर्णयावर तसेच वरिष्ठ अधिकारी यांनी घेतलेल्या निर्णयावर तसेच अधिकाऱ्यांवर कोणत्याही प्रकारचे मत, आक्षेप टीका नोंदवू नये. अन्यथा त्यांच्या विरुद्ध महाराष्ट्र नागरी सेवा ( वर्तणूक ) 1979 अंतर्गत शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल. असे संचालक, अभियोग संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांनी स्पष्ट केले आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार 1958 साली स्थापन झाले आहे. राज्यातील अभियोक्त्यांचा स्वतंत्र प्रवर्ग स्थापन करण्यात आला असून ते प्रशासकीय नियंत्रणात आहे. सत्र न्यायालयात गुन्ह्याच्या तपासकामी किंवा सत्र न्यायालयात केस चालवीतांना झालेल्या काही दोषामुळे आरोपीची निर्दोष मुक्तता झाली असल्यास ते दोष निदर्शनास आणणे हे या संचालनालायचे मुख्य कार्य आहे. संचालक म्हणून जिल्हा व सत्र न्यायाधीश वर्गातील न्यायाधीशातून वर्ग करून होत होती. परंतु नंतर शासनाने नंतर भारतीय पोलीस सेवेतील पोलीस महानिरीक्षक दर्जावरील अधिकाऱ्याची नियुक्ती करण्याचा निर्णय घेतला.

# नक्षल नेता बसवराजूच्या मृतदेहासाठी कुटुंबाची न्यायालयात धाव



**गडचिरोली :** भारतीय कम्युनिस्ट पार्टीचा (माओवादी) सरचिटणीस तसेच नक्षलवाद्यांचा सर्वोच्च नेता नंबाला केशव राव उर्फ बसवराजू याच्या कुटुंबीयांकडून त्याचा मृतदेह आपल्या ताब्यात द्यावा, अशी मागणी करणारी याचिका आंध्र प्रदेश उच्च न्यायालयात दाखल करण्यात आली आहे. शनिवारी 25 मे रोजी यावर झालेल्या सुनावणीदरम्यान न्यायाल्याने मृतदेहासाठी छत्तीसगड पोलिसांकडे मागणी करा, असे सांगून या संदर्भातील दोन याचिका निकाली काढल्या. 21 मे रोजी छत्तीसगडमधील अबुझमाड जंगल परिसरात झालेल्या चकमकीत थेट नक्षलवाद्यांचा सर्वोच्च नेता नंबाला केशव राव उर्फ बसवराजू ठार झाला. त्याच्यासोबत आणखी 26 नक्षल्यांना टिपण्यात पोलिसांना यश आले. नक्षलवाद्यांच्या इतिहासात पहिल्यांदाच इतका मोठा नेता चकमकीत ठार झाला आहे. एरवी पोलीस प्रशासन ठार झालेल्या नक्षलवाद्यांचे मृतदेह त्यांच्या कुटुंबीयांना सुपूर्द करतात. पण बसवराजूच्या प्रकरणात उशीर होत असल्याने त्याच्या नातेवाईकांनी आंध्र प्रदेश उच्च न्यायालयात दोन याचिका दाखल करून मृतदेह ताब्यात देण्याची विनंती केली. यावर शनिवारी झालेल्या सुनावणीदरम्यान न्यायालयाने दोन्ही पक्षाची बाजू ऐकून घेतल्यानंतर याचिकाकर्त्यांना मृतदेहासाठी छत्तीसगड पोलीस प्रशासनाकडे जाण्याची सूचना केली. यावेळी छत्तीसगडचे महाधिवक्ता यांनीदेखील शनिवारपर्यंत शवविच्छेदन आणि तपासणी पूर्ण होणार असल्याचे सांगून लवकरच मृतदेह त्यांच्या कुटुंबीयांना सुपूर्द करणार असे न्यायालयात स्पष्ट केले.

# निवासी शिबिराच्या माध्यमातून मुलांना डॉ. बाबासाहेबांप्रमाणे विद्वान करण्याचा बीडीएसपी संघाचा प्रयत्न



**नागपूर :** दिनांक 29 ते 31 मे 2025 असे तिन दिवशीय निवासी बाल धम्म संस्कार शिबिराचे आयोजन बीडीएसपी संघाने , बानाईच्या मदतिने डॉ बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन, उरूवेला कॉलोनी येथे आयोजित केलेले आहे. या शिबिरात 10 वर्षावरिल मुले सहभागी होणार असून सकाळी 4 वाजता पासून तर रात्रीचे 9 वाजेपर्यंत चे वेळापत्रक बीडीएसपी संघाने तयार केलेले आहे. या शिबिरात मुलांना जेवणापासुन ते झोपेपर्यंतच्या संस्काराने संस्काररित केल्या जाणार आहे. मुलांमध्ये सांघिक भावना निर्माण व्हावी व त्यातून त्यांच्यात आत्मविश्वास विकसित करुन, ÷ आम्ही सुद्धा बाबासाहेबांसारखे होवु शकतो ÷ हा विश्वास त्यांच्यात उत्पन्न करण्यात येणार आहे.

अत्त दिप भव या तथागतांच्या तत्वाचा आधार घेऊन मुलांमध्ये सकारात्मक मानसिकता निर्माण करण्यासाठी व त्यातून त्यांचे मनोबल उंचावुन , ÷ आम्ही पण बाबासाहेबांसारखेच शील सदाचारी व विद्वान होवु शकतो ÷ असा विश्वास मुलांमध्ये निर्माण केल्या जाणार आहे. या शिबिरात 60 च मुला मुलींची निवड करण्यात येणार असून बीडीएसपी संघाचे 20 धम्म सेवक या शीबीराच्या यशस्वीतेसाठी नेमलेले आहेत. त्यामध्ये 10 महिला व 10 पुरुष असतील.

बाल धम्म संस्कार शिबिरांच्या या श्रृंखलेत पहिल्या टप्प्यात फक्त बीडीएसपी संघाच्या, ÷धम्म आपल्या घरी÷ या उपक्रमाशी जुळलेल्या मुलांनाच सहभागी होता येणार आहे. तरी अधिक माहितीसाठी आपण 7387723156 शी सम्पर्क करावा.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर अभ्यासिकेतर्फे अभय रामटेके याचा सत्कार



**अमरावती :** स्थानिक पंचशील हाऊसिंग सोसायटी, तक्षशिला महाविद्यालय चौक अमरावती येथील मेत्ता विल्ला या सुरेंद्र घरडे यांच्या निवासस्थानी नुकताच डॉ. बाबासाहेब आंबेडकर अभ्यासिकेचा आदर्श विद्यार्थी अभय अजय रामटेके याने संपूर्ण महाराष्ट्रात महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित घेतलेल्या परीक्षेत महाराष्ट्र राज्यातून 5 वा. क्रमांक आणला तर अमरावती जिल्ह्यातून प्रथम क्रमांक प्राप्त केला.या उल्लेखनीय शैक्षणिक कार्याला अनुसरून त्याच्या सोबतीच्या सहविद्यार्थी, विद्यार्थीनींनी अभय रामटेके याचा सत्कार करण्याचे योजिले होते, त्यानुसार डॉ. बाबासाहेब आंबेडकर अभ्यासिकेत सामाजिक कार्यकर्ते तथा वृत्तपत्र स्तंभलेखक आर.एस. तायडे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सत्कार समारंभात डॉ. बाबासाहेब आंबेडकर अभ्यासिकेच्या संचालिका रमा सुरेंद्र घरडे, मेत्ता बहूउद्देशीय संस्थेचे संस्थापक सुरेंद्र घरडे, प्रख्यात बौद्ध धम्म प्रसारक एस कुमार मेश्राम, साप्ताहिक वज्जी संदेशच्या संपादिका माया वासनिक, गेडाम, ज्येष्ठ कवी दिगंबर झाडे, धर्मशिल गेडाम आंबेडकरी पथनाट्यकार विलास थोरात, अजय रामटेके इत्यादी अतिथी मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी एस. कुमार मेश्राम, रमा घरडे, अजय रामटेके, धर्मशिल गेडाम इत्यादींनी आपले मनोगत व्यक्त केले, तर सत्काराला उत्तर देतांना अभयने आपल्या यशाचे सर्व श्रेय आपले कर्तव्यदक्ष वडील अजय रामटेके यांना दिले. सोबतच त्याने वडिलांच्या गौरवपर शब्दबद्ध केलेली वास्तववादी सुरेख कविता सादर केली. अध्यक्षिय भाषणात आर.एस. तायडे यांनी सांगितले की, कोणतेही यश संपादन करायचे असेल तर त्यासाठी अभ्यासकांनी जिद्द, चिकाटी आणि सातत्य ठेवण्याची गरज आहे, अर्थात कोणत्याही कामात अपयश येणे म्हणजे त्या कामासाठी प्रामाणिक प्रयत्नच केले नाहीत असे त्यांनी या प्रसंगी सांगितले. कार्यक्रमाला अभ्यासिकेतील समिक्षा आठोर, तनुश्री घरडे, प्राची मेश्राम, दिव्या दरडे, पुजा भोवते, स्नेहल मेश्राम, गौरव तिरथकर, रोशन पाटील, शुभम मेश्राम, केतन वानखडे, अभय रामटेके, अनिकेत वानखडे, संजना डोंगरे, प्रतिक्षा थोरात, भुषण ओंबासे, मनिषा अंभोरे, दिपाली इंगोले, शैलेश मेश्राम इत्यादी विद्यार्थी व विद्यार्थीनी आवर्जून उपस्थित होते.या कार्यक्रमाचे उत्कृष्ट संचालन प्रियंका वानखडे हिने तर प्रास्ताविक प्रणाली घरडे हिने केले तर आभार प्रदर्शन निधी देवरे हिने केले.


## स्टुडिओ किरायाने देणे आहे



दैनिक बहुजन सौरभने एक उत्कृष्ट दर्जाचा स्टुडिओ तयार केलेला आहे. बेरोजगार विद्यार्थ्यांसाठी एक आठवड्याचा मोफत कोर्स करण्याचा मानस आहे. ज्या कोणाला नाटक, गाणी, कराओके किंवा फेसबुक रिलवर टाकणारी कोणतीही माहितीसाठी स्टुडिओचा वापर करायचा असल्यास तासाप्रमाणे भाड्याने देणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क साधावा.



मो. 8482839451


बहुजन सौरभ प्रकाशक, संपादक, मालक, मुद्रक सिध्दार्थ जीवन कांबळे यांनी देश प्रेस पब्लिकेशन, E-30/2, इंडस्ट्रीयल एरिया, सोनेगाव (सीम), हिंगणा, एम.आय.डी.सी., नागपूर - 440016 येथे मुद्रित केले व 9/2, स्वराज कॉलनी, मेडिकल कॉलेजच्या मागे, नागपूर-440027, येथे प्रकाशित केले. RNI No. MAHMAR 2020/84035 Printed, Owner by Siddharth Jiwan Kamble, Publisched at 9/2 Swaraj Colony, Behind Medical College, Nagpur 440027, Printed at M/S Desh Publication, E-30/2, Industrial Area, Sonegaon (SEEM), Hingna, MIDC, Nagpur-440016, Editor Siddharth Jiwan Kamble Email: bahujansaurabh@gmail.com Mobile: 9422860648